बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

सामाहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

gnmXH$ : - I_Ð H$Qa, ghgnmXH$ :- gae ^XmS

वर्ष -१० | गोंदिया | अंक ०३ | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | बुधवार,दि.२३ डिसेंबर २०२० | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021

फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राही जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)





बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ

## आर्थिक अनियमितता; समता प्रतिष्ठान चौकशीच्या फेऱ्यात

**नागपूर :** बार्टीच्या अधीनस्थ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान संस्थेमध्ये आर्थिक गैरव्यवहार आढळल्याने सामाजिक न्याय खात्याचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी केली जाणार आहे.

समता प्रतिष्ठानला गेल्या तीन वर्षांत दिलेल्या १६ कोटी रुपये खर्चाचा हिशेब देता आला नाही. तसेच निविदा न काढता काम दिले गेले किंवा निविदा प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने राबवल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. यासंदर्भातील तक्रारीनंतर सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी याप्रकरणी चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार या संस्थेच्या संपूर्ण कारभाराची चौकशी होणार आहे.




समतादूत प्रकल्पावर झालेल्या खर्चाचा हिशेबही द्यावा लागणार आहे. जाहिरात न देता या प्रकल्पात दूत नेमण्याची चौकशी होणार असल्याने नागपुरातील प्रतिष्ठानच्या कार्यालयातील कर्मचारी आणि प्रकल्प अधिकारी तसेच समतादूत यांचे धाबे दणाणले आहे. समतादूत प्रकल्पासाठी जाहिरात देऊन भरती करण्यात आली नाही. त्याऐवजी खासगी कंपन्यांकडून मनुष्यबळ मागवले होते.

तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांच्या पुढाकाराने सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या अधीनस्थ बार्टीने समता प्रतिष्ठान संस्था आणि समतादूत प्रकल्प सुरू केला. यासाठी खासगी कंपनीने मनुष्यबळ पुरवले होते. मात्र योगायोगाने महत्त्वाची पदे माजी मंत्री बडोले यांचे खासगी सचिवांच्या नातेवाईकांना मिळाली होती.

> याप्रकरणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे चौकशीची मागणी केली होती. सर्व संबंधितांवर कारवाई झाली तरच चौकशीला अर्थ राहणार आहे. डॉ. आंबेडकर यांच्या १२५व्या जयंती कार्यक्रमावरील खर्चात अनियमितता झाली आहे. यासंदर्भात तक्रार करून चार वर्षे झाली.
>
> **ई.झेड.खोब्रागडे**
> **निवृत्त सनदी अधिकारी,अध्यक्ष, संविधान फाऊंडेशन**

**नातेवाईकांची नियुक्ती..**

★माजी मंत्र्यांच्या खासगी सचिवांचे बंधू पंकज माने यांची समतादूत प्रकल्प संचालक म्हणून, तर त्यांच्याच दुसऱ्या नातेवाईकाची प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यासंदर्भात मंत्रालयाकडे तक्रार आली होती.

★यात सनदी लेखापाल यांच्या अहवालात आर्थिक त्रुटीवर बोट ठेवण्यात आले. प्रतिष्ठानने निविदा प्रक्रिया न राबवता कामे दिली किंवा निविदा प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने राबवण्यात आली.

★या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सामाजिक न्याय खात्याचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे आदेश देण्यात आले.

★या समितीत समाज कल्याण आयुक्त, पाटीचे महासंचालक राहणार आहेत. एक महिन्यात समितीला अहवाल देण्याची सूचना करण्यात आली आहे.

## नक्षली भागातील गावे जोडणाऱ्या १०० पुलांचे काम रखडले



**गोंदिया:** नक्षलग्रस्त भागात संकटाच्या वेळी तत्काळ पोहोचता यावे यासाठी केंद्र शासनाने गडचिरोलीतील रस्त्यांवर १०० पूल बांधण्याचा विशेष कार्यक्रम हाती घेतला. सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) यासाठी संरक्षण खात्यातील पूल बांधण्याचा अनुभव असणाऱ्या एका मिनीरत्न कंपनीला कंत्राट दिले. मात्र काम सुरूहोण्याआधीच नव्याने टेंडर मागवण्यात आले. यामुळे मे २०१९ ची डेडलाइन असणारे काम अद्यापही सुरू झालेले नाही. त्यामुळे २०९ दुर्गम गावांचा जगाशी संपर्क तुटलेलाच आहे. यावर कॅगने ताशेरे ओढले आहेत.

नक्षली भागात कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी केंद्राने रस्ते बांधण्याचा विशेष कार्यक्रम सुरू केला होता. त्याची अंमलबजावणी करत राज्य सरकारने फेब्रुवारी २०१८ मध्ये पीडब्ल्यूडीला गडचिरोलीतील २०९ गावांत लवकर पोहोचण्यासाठी १०० बेली ब्रिज बांधण्याचे निर्देश दिले. बेली ब्रिज प्री-फॅ ब्रिकेटेड पॅनल्सपासून तयार होतात. त्यांची जोडणी करून कमी वेळेत पूल तयार होतो. एप्रिल २०१८ मध्ये सरकारने पीडब्ल्यूडीच्या नागपूर विभागाला लवकर प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करण्याची सूचना केली. मे २०१९ पर्यंत हे काम पूर्ण होणे अपेक्षित होते.

तरीही काम अपूर्णच : नवरत्न कंपनीने काम सुरूकरण्याची तयारी केली असताना पीडब्ल्यूडीने मार्च २०१९ मध्ये पुलाची रुंदी बदलून ५.३० मीटर केली व नवीन टेंडर बोलावले. ऑगस्ट २०१९ मध्ये कॅगने या बदलाचे कारण विचारले. त्याचे उत्तर पीडब्ल्यूडीला देता नाही आले. पहिल्या टप्प्यात फक्त ७ ब्रिज बांधण्याला परवानगी मिळाली असून ते डिसेंबर २०१९ पर्यंत पूर्ण करणार असल्याचे सांगितले. हे काम मे २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. जानेवारी २०२० मध्ये कॅगला दिलेल्या उत्तरात पीडब्ल्यूडीने ५ पुलांचे टेंडर निश्चित तर २ निश्चित होण्याच्या मार्गावर असल्याचे सांगितले. प्रत्यक्षात एकही पूल तयार झालेला नाही.

**मिनीरत्न कंपनीला काम**

मे २०१८ मध्ये गडचिरोली सर्कलने संरक्षण खात्याअंतर्गत काम करणाऱ्या आणि ५३०० हून अधिक बेली ब्रिज बांधण्याचा अनुभव असणा?या एका मिनीरत्न कंपनीला कामासाठी निमंत्रित केले. जुलै २०१८ मध्ये शासनाला एक प्रेझेंटेशन दिले. एका ब्रिजची रुंदी ४.२५ मीटर ठरवण्यात आली. ऑगस्ट २०१८ मध्ये कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला. नोव्हेंबर २०१८ मध्ये ७ ब्रिजसाठी २.८८ कोटी रुपयांचा निधी मिळाला.

**कॅगचे ताशेरे :** पीडब्ल्यूडीने मिनीरत्न कंपनीबरोबरच्या कराराचे पालन केले नाही. नवीन कंपनीलाही काम दिले नाही. यावरून नियोजनाचा अभाव, केंद्राच्या योजना राबवण्यात अपयश आणि कोणत्या कामाला प्राथमिकता द्यायची याबाबत शासनाकडे स्पष्टता नसल्याचा ठपका कॅगने ठेवला आहे.

## देशात बिबट्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर





**गोंदिया:** भारतात वाघांसोबतच बिबट्यांची देखील गणना केली जात असून बिबट्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. केंद्रीय पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी “स्टेट्स ऑफ लेपर्ड इन इंडिया २०१८’ हा अहवाल सोमवारी प्रसिद्ध केला. या अहवालानुसार, महाराष्ट्रात एक हजार ६९० बिबटे आहेत.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण आणि भारतीय वन्यजीव संस्था यांनी हा अहवाल तयार केला आहे. या अहवालानुसार, २०१४च्या तुलनेत २०१८ साली देशात बिबट्यांची संख्या ६० टक्क्यांनी वाढली आहे. २०१४ मध्ये आठ हजार बिबटे होते. २०१८ मध्ये ही संख्या १२ हजार ८५२ इतकी झाली. संरक्षित वन-क्षेत्रात बिबट्यांची गणना करण्यात आली आहे. मात्र, बिबटे हा गावाच्या सीमेलगत राहणारा प्राणी असल्यामुळे त्यांची एकूण संख्या यापेक्षाही अधिक असण्याची शक्यता वन्यजीव तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. संरक्षित क्षेत्राशिवाय शेतशिवारात बिबट्यांचा वावर मोठया प्रमाणात आहे. वाघांचा अधिवास असणाऱ्या संरक्षित वन-क्षेत्रात आणि काही ठिकाणी शेत जमिनीवरही ही गणना करण्यात आली. महाराष्ट्र बिबट्यांच्या संख्येत तिसऱ्या क्रमांकावर असला तरीही गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी बिबट्यांचे मृत्यू अधिक आहेत. यावर्षी सुमारे १७५ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे. बिबट्यांच्या माणसांवरील हल्ल्यात देखील वाढ झाली आहे. बिबट्यांच्या संदर्भात कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे. बिबट्यांच्या मृत्यूत वाढ झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

**बिबट्यांची संख्या**

| | |
|---|---|
| मध्यप्रदेश : | ३, ४२१ |
| कर्नाटक : | १, ७८३ |
| महाराष्ट्र : | १, ६९० |
| कर्नाटक, तामिळनाडू, गोवा, केरळ : | ३, ३८७ |
| उत्तरप्रदेश, उत्तराखंड, बिहार | : १, २५३ |

## गोंदिया जिल्ह्यात आजपर्यंत १३३९९ रुग्ण

**गोंदिया,- :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून आज २२ डिसेंबर रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवे २२ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले. २५ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांनी औषधोपचारातून कोरोनावर मात केल्याने त्यांना आज सुट्टी देण्यात आली. आजपर्यंत १३३९९ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. १२९१८ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या ३०४ आहे. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९५.५८ टक्के आहे. बाधीत रुग्णांचा मृत्यु दर हा १.२३ टक्के आहे. जिल्ह्यातील १७७ रुग्णांचा आतापर्यंत मृत्यू झाला.

**आज जि.प.कर्माचाऱ्यांची तपासणी**

गोंदिया जिल्हा परिषदेतील सर्व कर्मचाऱ्यांची २३ डिसेंबरला जि.प.सभागृहात कोरोनाची तपासणी (स्वँब टेस्ट)करण्यात येणार आहे.

## ओबीसी विद्यार्थ्यांसाठी महज्योतीतर्फे राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

**नागपूर:** ओबीसी, भटके जाती जमाती आणि विशेष मागास वर्ग यांच्या विद्यार्थी व युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्यावतीने (महाज्योती) महात्मा जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे जीवनपट व त्यांच्या समाजकार्याला उजाळा देण्यासाठी महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरिता राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. फुले दांम्पत्यांच्या समाजकार्याची उजळणी व त्यांच्या कार्याची नविन पिढीत बिजांकुर व्हावे,या उद्देशाने ३ जानेवारी २०२१ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यस्तरीय ५० हजार रुपयाचा प्रथम पुरस्कार तसेच १० हजार रुपयाचा जिल्हास्तरीय पुरस्कार व प्रोत्साहन पर पुरस्कार ठेवण्यात आले असून ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांनी या निबंध स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन महाज्योतीचे संचालक प्रा. दिवाकर गमे व स्टुडंटस युनियनचे अध्यक्ष उमेश कोराम यांनी केले आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयात,कुठल्याही पदवी शाखेचे शिक्षण घेत असलेले सर्व विद्यार्थी पात्र राहणर आहेत. निबंधाचे विषय. सावित्रीबाई




फुले आणि सार्वत्रिक शिक्षण, स्त्री पुरुष समानता आणि सावित्रीबाई फुले यांचे विचार, पहिल्या भारतीय स्त्रीवादी विचारवंत. असे असुन निबंधाची शब्द मर्यादा १००० शब्द एवढी आहे.

या निबंध स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र निबंध स्पर्धा असुन त्या जिल्ह्यासाठी प्रथम १० हजार दुसरे ५ हजार व तिसरे अडीच हजाराचा पुरस्कार आहे. तर या सर्व जिल्ह्यातुन निवडुन आलेल्या पहिल्या तीन पुरस्कारर्थींना राज्य स्तरावरील, प्रथम ५० हजार, द्वितीय ३५ हजार व तृतीय पुरस्कार २५ हजाराचा देण्यात येणार आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या निबंधासह चालु वर्षाच्या ओळखपत्राची प्रत किंवा महाविद्यालयातील प्राचार्यांकडुन निबंध प्रमाणित करून mahajyoti.org.in या संकेतस्थळावर २७ डिसेंबर २०२० पर्यंत अपलोड करावयाचे आहे.जिल्हा स्तरावरील पुरस्कार २६ जानेवारीला संबंधित जिलह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते तर राज्यस्तरावरील पुरस्कार मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, मंत्री छगनराव भुजबळ,मंत्री विजय वडेट्टीवार, मंत्री बच्चु कडु यांच्या उपस्थितीत वितरित करण्यासंदर्भात नियोजन असल्याची माहिती प्रा.गमे यांनी दिली आहे.

## दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल बुधवारी

राज्य मंडळाने नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये घेतलेल्या दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल बुधवारी (२३ डिसेंबर) दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना www.mahresult.nic.in या संकेतस्थळाद्वारे निकाल पाहता येईल, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, मुंबई, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावी आणि इयत्ता बारावीची पुरवणी परीक्षा घेण्यात आली होती. बुधवारी दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना विषयनिहाय गुण पाहता येतील. निकालची प्रिंटआऊट घेता येईल. उत्तरपत्रिकेच्या पूनर्मूल्यांकनासाठी विद्यार्थ्यांना अर्ज करता येईल.

## जिल्ह्याच्या विकासासाठी चांगल्या लोकप्रतिनीधींना सहकार्य करणाऱ्या स्थानिक प्रतिनिधीना निवडून द्या-खा.प्रफुल पटेल

**भंडारा**-जिल्ह्याचा राजकीय दृष्टिने वजन आणि विकास निर्माण करण्यासाठी चांगल्या लोकप्रतिनिधींची आणि विकासाची कास असलेल्यांची गरज असायला हवी.त्याकरीता येत्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या होणाऱ्या निवडणुकामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातून चांगले पदाधिकारी निवडून कसे येतील यासाठी सर्वांनी नेटाने काम करावे असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते खासदार प्रफुल पटेल यांनी केले. भंडारा गोंदिया जिल्हयाला मी सारखाच समझतो.

मुंबई किंवा दिल्लीत कामे करण्यासाठी आपले वजन खर्च करावे लागत असते. आगामी निवडणूकीत आमच्या पक्षाचे जास्तीत जास्त प्रतिनिधी निवडले पाहिजे या साठी सर्वांनी कामे करावी असे शहापूर ( भंडारा ) येथे आयोजित कार्यकर्ता बैठकीत खासदार पटेल यांनी व्यक्त केले. या परिसरात डिफेंस सर्विस अकेडमी ही एक चांगली संस्था आपल्या भागात काम करीत आहे.


शेतकऱ्यांना यावर्षी ७००/- बोनस मिळवून देण्याचे जे वचन आम्ही दिले होते ते आम्ही पूर्ण करवून दाखवले.यावेळी सर्वश्री जिलाध्यक्ष नानाभाऊ पंचबुध्दे, आमदार राजुभाऊ कोरेमोरे, माजी खासदार मधुकरजी कुकडे, धनंजय दलाल, सुनिल फुंडे, महेंद्र गडकरी, सुमेध श्यामकुंवर, नरेंद्र पालांदुरकर, नारायणसिंग राजपुत, नरेंद्र झंझाड, अनिल (डिम्पल) मल्होत्रा, राजेश मेश्राम, जयेश संघाणी, रुशी लेंडे, तोमेश्वर पंचभाई, मोरेश्वर गजभिये, सुनिल शहारे, दिनदयाल देशभ्रतार, होम देव चकोले, राजेश डोरले,शेखर गभणे, अनिल कळंबे, आरजु मेश्राम, अल्का रंगारी, नरेश धुर्वे, अमन मेश्राम, अंजुम बुरडे, अरविंद तिरपुडे, एड. किशोर लांजेवार, राम रतन वैरागडे, भोला वैरागडे, नितेश खेत्रे व इतर उपस्थित होते.

## “पोस्ट मॅट्रिक” शिष्यवृत्ती बंद करण्याचा घाट!-डॉ.सुखदेव थोरात

**नागपूर:** केंद्र सरकारने देशातील अनुसूचित जाती आणि जमातीच्या शैक्षणिक प्रगतीत मैलाचा दगड ठरलेल्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीमधील (पीएसएम) आपला वाटा कमी करून तो केवळ ११ टक्क्यांवर आणला असून ही योजनाचा गुंडाळण्याचा घाट रचला जात आहे, असा आरोप विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी केला. शुक्रवारी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

डॉ. थोरात म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वत: महाविद्यालयीन आणि विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी १९४४ मध्ये पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती सुरू केली. ही योजना गेल्या ७६ वर्षांपासून कार्यरत असून अनुसूचित जाती-जमातीच्या शैक्षणिक प्रगतीत तिने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रारंभी या योजनेअंर्तगत केंद्र सरकार राज्यांना पूर्ण आर्थिक मदत देत होते. केंद्रीय योजना म्हणूनच ती सुरु झाली होती. कालांतराने राज्य आणि केंद्र अशा संयुक्त योजनेत ती रूपांतरित झाली. सुरुवातीला या योजनेत केंद्र सरकारचा वाटा जास्त होता. आता तो ४० टक्के केंद्र व ६० टक्के राज्य असा झाला आहे. केंद्राचा ४० टक्के वाटा सुद्धा राज्यांना उशिरा मिळत आहे. गेल्या काही वर्षांत या योजनेसाठी केंद्र सरकारकडून मिळणारा निधी चक्क ११ टक्क्यांपर्यंत खाली गेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेवर मिळणे कठीण झाले आहे.

केंद्र सरकार शिष्यवृत्ती (पीएसएम) मधला आपला वाटा आता केवळ १० टक्के इतका मर्यादित करण्याचा विचार करीत



असल्याची माहिती समोर येत आहे. असे झाल्यास राज्यांना शिष्यवृत्तीचा ९० टक्के भार सोसावा लागेल. जे राज्यांसाठी अशक्य आहे. अनेक राज्यांनी तर केंद्र सरकारला हा भार सोसण्यास असमर्थ असल्याचे सांगून टाकले आहे. अशाप्रकारे केंद्र सरकार अत्यल्प निधी देणार आणि राज्यांना ती योजना चालवणे शक्य होणार नाही. म्हणजे ही योजना आपोआप बंद पडेल. केंद्र सरकारचा वाटा कमी झाल्यास उच्च शिक्षणामधील अनुसूचित जाती आणि जनजातीची प्रगती खोळंबणार आहे. आधीच या समूहाचा उच्च शिक्षणामधला वाटा कमी आहे, त्यात या वर्गाला संधी नाकारण्याचा हा कुटील डाव आहे. सर्व अनुसूचित जाती-जमाती विद्यार्थ्यांकरिता सध्याच्या उत्पन्नाचे पात्रता निकष २ लाख रुपये इतके आहे. ते निकष आठ लाखापर्यंत वाढवण्यात यावे, असेही डॉ. थोरात म्हणाले.

> **“केंद्राने पीएमएस योजना सुरू ठेवण्यासाठी आपली वचनबद्धता जाहीर करावी. केंद्र व राज्य यांच्यातील ६०-४० वाटा या सूत्राची तातडीने अंमलबजावणी केली जावी. शिष्यवृत्ती नियमित देण्यासाठी केंद्राने दरवषी १० हजार कोटींची तरतूद करावी.”**
>
> **- डॉ. सुखदेव थोरात**
> **माजी अध्यक्ष,विद्यापीठ अनुदान आयोग.**

सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाने सीपीआय (ग्राहक किंमत निर्देशांक) सध्या आणि आगामी महागाई आधारित मासिक पीएमएस रकमेच्या युनिटमध्ये वाढ केली पाहिजे. जेणेकरून शैक्षणिक खर्चाची आगामी गरज योग्यप्रकारे पूर्ण केली जाईल. सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय आणि आदिवासी कार्य मंत्रालयाकडून विद्यार्थ्यांच्या खात्यावर पैसे वेळेवर जातील याची खात्री करण्यासाठी अधिक चांगली देखरेखीची यंत्रणा स्थापना केली पाहिजे, याकडेही डॉ. थोरात यांनी लक्ष वेधले.

## शिवसेनेची ताकद वाढविण्याकरिता ग्राम पंचायत निवडणूक जिंका-एकनाथ शिंदे



**गोंदिया:** एकेकाळी पूर्व विदर्भात शिवसेना मजबूत होती. शिवसेनेला गतवैभव मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत निवडणुकीच्या निमित्ताने शिवसेना जोर लावत आहे.गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली येथे पदाधिकाऱ्यांच्या बैठका आणि कार्यकर्ता मेळावे पार पडले असून कार्यकर्त्यांना तयारीला लागण्याच्या सुचना गडचिरोली-गोंदियाचे संपर्क मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

गडचिरोलीचे पालकमंत्री आणि चंद्रपूर व गोंदिया जिल्ह्याच्या संपर्क मंत्रीपदाची जवाबदारी असलेले एकनाथ शिंदे यांनी पूर्व विदर्भात ग्रामपंचायतीच्या निवडणूका आणि त्यानंतर होणाऱ्या नगर पंचायतीच्या निवडणुकीत शिवसेनेला यश मिळवून देण्यासाठी कंबर कसली आहे. सोमवार (दि.२०) गोंदिया येथील इसरका सभागृहात आयोजित शिवसेनेचा कार्यकर्ता मेळाव्यात बोलतांना शिंदे यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे सांगितले. सरकारने आता मागास जिल्ह्याचे चित्र बदलविण्याची तयारी केल्याने भविष्यात त्यांचे सकारात्मक परिणाम दिसतील असे ते म्हणाले.महाविकास आघाडीने कोरोना संकटात ही जनतेला साथ देत विकासात्मक कामे केली. तरी विरोधी पक्षाला मात्र अद्यापही आपण विरोधी बाकावर असल्याची जाणीव झाली नसल्याची टिका केली. महाविकास आघाडीमध्ये सहभागी असलेल्या सर्व पक्षांना सोबत घेऊन आपल्याला निवडणूका लढवायच्या आहेत. गोंदिया जिल्ह्याच्या विकासासाठी शिवसेना पक्ष प्रमुख व मुख्यमंत्री यांच्या सोबतीला प्रफुल पटेल ही असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांना दिला. सोबतच शिवसेनेची ताकद वाढविण्याकरिता शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी नियोजन करुन पॅनल उभे करावेत. निकालानंतर सत्ता स्थापनेसाठी स्थानिक समीकरणानुसार निर्णय घेतले जातील असे स्पष्ट केले.

मेळाव्याला जिल्हा प्रमुख मुकेश शिवहरे, सुरेंद्र नायडू, पंकज यादव, सुनील पालांदूरकर, सुनील लांजेवार, शैलेष जायस्वाल, गोलू डोहरे, दिलीप गुप्ता, गुड्डू उके, राजु चामट, देवेंद्र चौधरी, वीनीत मोहिते, पिंटू बावनकर, सुनील शहारे, मनोज लिल्हारे, नितेश जैस्वाल, सुनील जमईवार, विवेक पारधी, प्रणीत बैस, अरुण हीरापुरे, संतोष भलावी,सुनील सेंगर, यश खोब्रागडे, रविन्द्र राउत, राज बोरकर, सुरेश पटले, अशोक सरकार, रितेश बोरकर, अमीन शहारे,आदि शिवसैनिक उपस्थित होते.



## संपादकीय

# बळीराजाची दिशाभूल नको!

कोरोनामुळे जगभरातील अनेक उद्योग, व्यवसाय तोट्यात गेले. त्यामुळे बेरोजगारी वाढली आहे, तर सुमारे ७० कोटी लोक अल्प मोबदल्यात काम करीत असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा (आयएलओ) ङ्कद वर्ल्ड एम्प्लॉयमेंट अँड सोशल आऊटलूक : ट्रेंड्स २०२०फ या अहवालात म्हटले आहे. गेली नऊ वर्षे जागतिक बेरोजगारीचे प्रमाण बहुतांश स्थिर आहे. मात्र जागतिक आर्थिक वाढ मंदावली आहे. याचाच अर्थ जागतिक स्तरावर कामगारांचे प्रमाण वाढत आहे, परंतु आपले शिक्षण पूर्ण करणा–या रोजगारक्षम तरुणांसाठी पुरेशी नवीन रोजगार निर्मिती होत नाही, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. याचा परिणाम म्हणून यंदा कोरोनामुळे जागतिक बेरोजगारीत बेसुमार वाढ झाली आहे.

"आयएलओ' ही संयुक्त राष्ट्रांची संघटना असून, आंतरराष्ट्रीय कामगार मानकांची स्थापना करून साजेशा रोजगारास चालना देणे आणि सामाजिक न्याय वाढविणे हे या संघटनेचे प्रमुख कार्य आहे. अहवालातील निष्कर्षानुसार, विकसनशील देशांमध्ये २०२०–२१ मध्ये बेरोजगारी प्रचंड वाढणार आहे. यामुळे सन २०३० पर्यंत जगभरातून गरिबीचे उच्चाटन करण्याच्या मोहिमेत अडथळे निर्माण होणार आहेत. या अहवालाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याकडील राजकीय नेते, अभ्यासक, सरकार शेती क्षेत्राकडे उद्योग म्हणून का बघत नाहीत, असा प्रश्न पडतो. देशात व राज्यात कोरोना महामारीमुळे एकूणच अर्थव्यवस्था कोलमडली आहे. प्रत्येकाचे आर्थिक गणित बिघडले आहे. सरकार म्हणून जे काही उपाय योजना करायला पाहिजे त्या सुरु आहेत. काही बाबीकडे आपल्याला लक्ष देणे गरजेचे वाटते.

शहरी आणि ग्रामीण असे दोन घटक आहेत. औद्योगिक करणामुळे जनतेचा ओढ शहराकडे सुरु झाला आणि ग्रामीण भागात शेतीकडे दुर्लक्ष झाले, त्याचप्रमाणे सुधारणाही शहर केंद्रीत झाल्या. भारत कृषीप्रधान देश आहे असे आपण म्हणतो. जमिनीची सुपीकता व विविधता सोबत त्यासाठी लागणारे पोषक वातावरण जगात अन्य कुठल्या देशात नाही, ते मात्र भारतात आहे.

कोरोनामुळे जग ठप्प झाले असताना देखील आपल्या जमिनीशी ईमान ठेवत कसणारा देशातील शेतकरी उभ्या ताठ मानेने कुठलेही कारण आणि तक्रार न करता घाम गाळून काम करत आहे. या पार्श्वभूमीवर शेती म्हणजे उत्पन्न निर्माण करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. मात्र सरकारने शेती करणे इतके अवघड करून ठेवले आहे की, या देशातील शेतकरी ७३ वर्षानंतर देखील पारतंर्त्यात आहे. आपण हे सत्य व वास्तविकता समजून घ्यायला हवी. राज्यातील तथाकथित शेतकरी नेते आणि शेतक–यांचा कैवार असल्याची वल्गना करणारे सरकारही सत्य आणि वास्तव समजून सांगत नाहीत. त्यामुळे लबाडी करून शेतक–यांची दिशाभूल करणारे हजारो नाही तर लाखो लोक तयार झाले आहेत. आपल्याकडे शेती हा उद्योग नाही, कारण शेतकऱ्यांसाठी वेगळे कायदे तयार करून त्यांचे उद्योग करण्याचे स्वातंर्त्य हिरावून घेतले. एखाद्या उद्योजकाला त्याचे उद्योग करण्याचे जे स्वातंर्त्य कायद्याने आहे, ते शेतक–यांना आहे का? यावर सगळ्यांची बोलती बंद होते कारण शेतकरी हा शहरातील नाही तर ग्रामीण भागात जगतो, त्याकडे कोणाचे लक्ष नाही. केंद्र सरकार काही प्रयत्न करत असतानाही विरोधाला विरोध करीत शेतकत्त्यांची माथी भडकविण्याचे उद्योग कसे सुरू आहेत, हे मागील पंधरा दिवसांपासून दिसून येत आहे.

कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊ शकेल असा विचार करत आपण नाही. त्यामुळे आज बेरोजगारी वाढत आहे. औद्योगिकरण सर्वच शहरांत शक्य नाही. औद्योगिकरणासाठी घेतलेल्या शेतक–यांच्या जमिनीची सध्या काय परिस्थिती आहे, हा संशोधन विषय आहे. हे सर्व समजून घेतले तर शेतकत्त्यांची दिशाभूल केली जात असल्याचेच दिसून येते. परंतु शेतक–यांनी प्रश्नाचा मुळावर जाऊन विचार करायला पाहिजे. शेतक–यांची अनेक मुले उच्चशिक्षित आहेत. त्यांनी तरी बापाचे खरे दु:ख समजून मुळावर घाव घालण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. स्वत:ला उद्योग म्हणून शेती करण्याचे स्वातंर्त्य मिळवावे लागेल. ज्या दिवशी हे होईल त्यादिवशी बेरोजगारी देखील कमी होईल. यासाठी देशात व राज्यात बेरोजगारी कमी करायची असेल तर शेतीक्षेत्र खुले करण्याशिवाय पर्याय नाही.

लॉकडाऊनमध्ये शेतकरी आत्महत्यांनी २० वर्षांतील उच्चांक गाठला. हे चित्र असताना सरकार शेतक–यांचे भले करेल असे समजणे दुर्दैवी आहे. उलट सरकार शेतक–यांना गुलामीतच ठेवते आहे. शेतक–यांनी शेती किती एकरात करावी हे सरकार ठरवणार, शेतक–यांच्या मालाची किंमत सरकार ठरवणार, कुठल्या प्रकल्पासाठी जमीन घ्यायची हेही सरकारच ठरवणार! हा सगळा प्रकार शेतक–यांना गुलामीत ठेवण्याचाच आहे.

शेतकऱ्यांचे उद्योग–स्वतंत्र घटनेने हिरावून घेतले. त्यामुळे शेतीमध्ये काही करायचे म्हटले, तर अडथळे येतात. हे सर्व बदलले पाहिजे! त्यासाठी व्यवस्था परिवर्तन महत्त्वाचे आहे. सत्ता बदलून प्रश्न सुटणार नाही. आज बेरोजगारी वाढली असे बोलले जाते परंतु ती कमी करण्यासाठी शेतीक्षेत्र कायद्याच्या बंधनातून काढून शेतक–यांना त्यांचे उद्योग स्वतंर्त्य द्यावे. महाराष्ट्रात व भारतात ९० टक्के शेती कोरडवाहू आहे. त्यापैकी ७५ ते ८५ टक्के शेतकरी अडीच ते पाच एकरवाले छोटे शेतकरी आहेत. या एवढ्या जमिनीच्या तुकड्यावर नफा कसा मिळेल, हे कोणी समजून सांगत नाही. शेतक–यांना शेती कशी करायची हे शिकवण्याची गरज नाही, तर शेती करण्यासाठी जे अडथळे कायद्यांमुळे निर्माण झाले आहेत. अर्थात सिलिंग कायदा, आवश्यक वस्तू कायदा तसेच जमीन अधिग्रहण कायदा हे तीन कायदे प्रामुख्याने रद्द करणे गरजेचे आहे. कायदे रद्द झाले तर ग्रामीण भागात शेतीक्षेत्रात सुधारणा होतील. शेतकरी स्वत: उद्योग म्हणून शेती करू लागेल. शेतीमध्ये उद्योग सुरु झाले की ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी होईल, असा विचार करून आज आवश्यक वस्तू कायद्यामध्ये काही बदल झाले तर लगेच काही मंडळी विरोधात रान उठवायला लागले. पैसे कमवणे गुन्हा आहे का? जर तसे नसेल तर मग भांडवलदार कब्जा करतील अशी भिती का वाटत असते? १९ वे शतक संपले तेव्हा परिस्थिती वेगळी होती आज २१ वे शतक आहे. शिक्षणाची दारे खुली झाली आहेत.

शेतकरी अज्ञानी राहिलेला नाही. शेतक–यांना व्यवसाय करण्याचे काहीसे स्वतंर्त्य आज मिळाले. तो आपला शेतीमाल कुठेही विकू शकेल, अशी मोकळीक देण्यात आली. बाजार समिती राजकारण्याचे व पैसे कमवण्याचे अड्डे बनले होते. शेतक–यांना फसवणूक, लुबाडणूक करत होते. आज व्यापारी शेतक–यांच्या बांधावर माल खरेदी करत असेल तर त्यात चुकीचे काय? शेतकरी स्वत:चा माल कुठे आणि कितीला विकायचा हे ठरवू शकत असेल तर सरकारी दलालांनी शेतक–यांची दिशाभूल करणे थांबवले पाहिजे. शेतीचे दार खुल्या अर्थव्यवस्थेसाठी उघडले गेले पाहिजे. जगासोबत स्पर्धा करू द्या. तो अधिकार शेतक–यांनाही मिळालाच पाहिजे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# संघ आणि शरद जोशी–छुपा अजेंडा,खुला अजेंडा!

एक शेतकरी नेता होता. राजीव गांधींच्या विरोधासाठी पॉलिस्टरला राजीववस्त्र म्हणून हिणवायचा ! राजीव वस्त्राची होळी करायचा.

एक अंबाणी होता. त्याचा पाताळगंगा नावाचा वस्त्राचा कारखाना होता. शेतकरी नेता कारखान्याला घेराव करायला निघाला. हजारो शेतकरी विश्वास ठेवून गोळा झाले. अंबानीनं नेत्याला काय मंत्र दिला माहीत नाही, घेराव रातोरात मागे घेण्यात आला. कुणाशी चर्चा नाही, कुणाला माहीत नाही.

लोकसभेची निवडणूक जाहीर झाली. शेतकरी नेत्यानं विरोधी पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा द्यायचा फंडा जाहीर केला. शेतकरी चळवळीतील योगदान हा निकष असल्याचा देखावा करण्यात आला. पण निवडतांना मात्र बहुतेक उमेदवार भाजपचे असतील याची काळजी घेतली गेली. हा केवळ योगायोग असेल का ?

प्रा. महादेवराव शिवणकर हे त्यावेळी भाजपाच्या किसान मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. शेतकरी आंदोलनात त्यांचं चांगलं योगदान होतं. त्यांना मात्र पाठिंबा दिला गेला नाही. तो प्रफुल्ल पटेल यांना दिला गेला. प्रफुल्ल पटेल हे कोणत्याही अंगानं शेतकरी आंदोलनाशी संबंधित नव्हते. मात्र मोठे भांडवलदार होते. अंबानी सारखा तेंदुपत्ता हा पटेल यांचा मोठा उद्योग होता. तो फॅक्टर महत्वाचा ठरला असेल का ? किंवा नागपूर शाखेचा विशेष आदेश होता का ? शिवणकर सारख्या शेतकरी नेत्याशी अशी बेइमानी कशासाठी केली गेली असेल ? त्यामागील लॉजिक आजपर्यंत समजलेलं नाही.

हे सारं आठवण्याचं कारण असं की, सद्या सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाच्या विरोधात शेतकरी संघटनेचे ( शिल्लक असलेले जोशी भक्त ) लोक जिवाच्या आकांतानं बोंब मारायला लागलेत. त्यावेळी शरद जोशी यांच्या अवतीभवती असलेले लोक, आताही ज्या पातळीवर जाऊन शेतकरी आंदोलनाची बदनामी करण्यात जीव ओतत आहेत, शेतकऱ्यांना खलिस्तानी, आतंकवादी सारखी दूषणे लावत आहेत, ते बघून संशय निर्माण होतो. बहुतेकांच्या सोशल मीडियावरील पोस्ट बघून हे सारे संघाचे स्लीपर सेल असावेत, याबद्दलचा संशय दृढ व्हायला मदतच होते. योगेंद्र यादव यांच्यासारख्या नेत्याला देखील या बाजारबसव्या वृत्तीच्या लोकांनी शेतकरी विरोधी जाहीर करून टाकले !

त्याचवेळी तिकडे मुकेश अंबानी पण शेतकऱ्यांच्या विरोधात पातळी सोडून बोलायला लागला असे ट्विट वाचण्यात आले. काँग्रेसच्या राज्यात शेतकरी उपाशी मरत होता, पण मोदींच्या काळात तो सहा महिन्याचे राशन घेवून दिल्ली फिरायला निघाला, अशी त्याची नीच कॉमेंट मीडियातून फिरत आहे. मुकेश अंबानी यांचा स्वतःचा बाप पेट्रोल पंपावर लोकांच्या गाडीत पेट्रोल भरण्याचं काम करत होता, हे मुकेश अंबानी यांना माहीत नाही का ? आता जेट मधून फिरणारे मोदी स्वतः तीस वर्षे भीक मागून जगत होते, असं मोदी स्वतः म्हणाले होते, याची आठवण अंबानी विसरले आहेत का ?

एक मोदी, दुसरे जोशी पण दोघांचीही कार्यपद्धती हेकेखोर, हुकुमशाही, दांभिक आणि दुटप्पी. वर दिलेली उदाहरणं इथं देण्याचा उद्देश प्रवृत्तीमधील साम्य दाखविणे एवढाच आहे !

संघाच्या परंपरेनुसार या बाबतीतही संघ स्वतः काही बोलताना दिसत नाही. एकीकडे त्यांच्यातल्याच एका संघटलेला आंदोलनाला समर्थन करण्याचं नाटक करायला लावलं आणि दुसरीकडे मोदी – शहा शेतकऱ्यांना गुलाम करायला निघालेत. बाजपेयी मंडल आयोगाची तोंड देखली भलावण करायचे आणि अडवाणींनी मंडल विरोधात रथयात्रा काढून देश पेटवून दिला. संघ गांधींना प्रत: स्मरणीय म्हणतो आणि त्याचे स्लीपर सेल गोडसेचा उदोउदो करतात, हीच परंपरा शेतकरी आंदोलना बाबतही सुरू आहे !

दांभिकपणा हा संघाचा स्थायीभाव आहे. संघाचा लोकशाहीवर विश्वास नाही. त्यांचे लोक देशात पुन्हा मनुस्मृती आणायला उतावीळ झालेत. सारा देश त्यांना गुलाम हवा. त्यांना लोकशाही चौकट नको आहे. ती उध्वस्त करायचीय. शरद जोशींना तरी दुसरं काय हवं होतं ? त्यांना सरकार नावाची व्यवस्थाच नको होती. 'सरकार क्या समस्या सुलझायेगी, सरकार ही समस्या है' हा त्यांचा प्रसिद्ध डायलॉग आहे. मग सरकार ऐवजी कोणती पर्यायी व्यवस्था आणणार, यावर मात्र जोशी चूप ! त्यांचे चेले चूप ! मनुस्मृती हवी, असं डायरेक्ट कसं म्हणणार बिचारे ?

खुली अर्थव्यवस्था असंघटित,



अज्ञानी आणि गरीब समूहाच्या फायद्याची कधीच असू शकत नाही. भारतीय शेतकरी जागतिक बाजारपेठेत तर सोडाच स्थानीय बाजारपेठेत देखील तग धरू शकत नाही. याची जाणीव शरद जोशी यांना नव्हती का ? महातावर आणणं आणि पानावर खाणंफ अशीच अवस्था बहुसंख्य शेतकऱ्यांची आहे. ते खरंच खुल्या बाजारपेठेत तग धरू शकतील का ?

संघाचं हिंदुत्व जसं, बोलाचीच कढी.. म्हणजे केवळ घोषणे पुरतं मर्यादित तशीच जोशींची मुक्त बाजारपेठ ! शेतकऱ्यांना तशी पर्यायी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा जोशींनी कधी प्रयत्न केला का ? निदान शेतकऱ्यांना बियाणं, खतं, फवारणीसाठी लागणारी औषधी यासाठी तरी संघटनेनं कधी पर्यायी व्यवस्था उभी केली होती का ? ती तर त्यांना सहज उभारता आली असती. कारण त्यांचे स्थानीय पातळीवरचे बहुतेक नेते हे कृषी सेवा केंद्राचे मालक होते. पण त्यांनी देखील खतं, बियाण्यांचा काळा बाजार केला, हे संघटनेला माहीत नव्हतं का ?

अर्थात, शरद जोशी डायरेक्ट संघ स्वयंसेवक असायलाच हवेत, असा त्याचा मुळीच अर्थ नाही. उलट अशावेळी वर वर विरोधी वाटणारी व्यक्तीच जाणीवपूर्वक निवडली जाते. जसे ओवेसी नेहमी भाजपा, संघ, हिंदू विरोधी गरळ ओकत असतात. आणि मग त्याची प्रतिक्रिया म्हणून भोळा भाबडा बहुजन हिंदू आयताच संघ, भाजपाच्या जाळ्यात अडकतो.

संघ दुटप्पी आहे, शरद जोशी देखील दुटप्पी होते. मात्र त्यांच्या अजेंड्यात कमालीचे साम्य होते. एकीकडे जोशी महात्मा फुले यांचे नाव घ्यायचे. विज्ञानवादी असल्याचा आव आणायचे. त्यांचा अंतिम संस्कार देखील वैज्ञानिक पद्धतीनं झाला म्हणतात. त्यांची राख किंवा अस्थी कुठं विसर्जित केल्या गेल्या, हे बाहेर कुणालाही माहीत नाही, त्यांनी त्यांची सारी संपत्ती देखील दान करून टाकली, हेही जाहीर आहे. पण मग सामाजिक जीवनात त्यांनी तशीच भूमिका घेतली होती का ?

शरद जोशींनी भोळ्या शेतकऱ्यांचे धार्मिक शोषण मात्र पद्धतशीरपणे केले. शेगाव सारख्या किंवा अन्य तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मेळावे घ्यायचे, बाया बापड्यांना देवाधर्माच्या आडून मोठी गर्दी उभी करायची. पण दुसरीकडे महात्मा फुले यांच्या नावाचाही वापर करायचा ! म्हणजे एकाचवेळी गजानन महाराज आणि महात्मा फुले या दोघांचाही हुशारीने वापर करायचा.. हा काय प्रकार आहे ?

बहुतेक कृषी सेवा केंद्र वाले शेतकरी संघटनेचे नेते होते. ( मोजके अपवाद असतीलही..पण ) हंगामामध्ये तेच सिड, खते, कीटकनाशके यांचा काळा बाजार करायचे. संघटनेच्या सदस्यांनाच दाम दुपटीनं विकायचे. याविरोधात शरद जोशींनी काय भूमिका घेतली होती ? उलट तेच लोक तर त्यांचे आधारस्तंभ होते.

एकंदरीत मोदीही तसेच आणि जोशी ही तसेच ! मोदीही 'सबका साथ, सबका विकास'ची बोंब मारत मारत काय दिवे लावतात हे आता लपून राहिलेले नाही. पक्षातल्या आपल्या सहकाऱ्यांना तर सोडाच पण राष्ट्रपती, उपराष्ट्रपती सारख्या संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तींना सुद्धा संसद भवनाच्या शिलाण्यास कार्यक्रमात पद्धतशीरपणे टाळणं, हा यांचा सबका साथ.. ! शरद जोशी यांनी सुद्धा संघटनेत पद घेतले नाही. पण इतर कुणाचीही स्वतंत्र ओळख निर्माण होणार नाही, याची पद्धतशीर काळजी घेतली. त्यांच्या संघटनेचे अध्यक्षपद फक्त एक वर्षांचे असायचे. अध्यक्ष झाला कधी आणि गेला कधी, लोकांना पताही लागायचा नाही. म्हणजे सारे.. एक दिवसाचे गणपती ! पण तो संघटनेचा अंतर्गत मामला आहे !

थोडक्यात, शरद जोशी यांची एकूणच वैचारिक मांडणी आणि प्रत्यक्ष कृती ही निव्वळ गोंधळात गोंधळ होता. त्याचाच दृश्य परिणाम म्हणून त्यांची मुख्य धारा जवळपास नष्ट होण्याच्या परिस्थितीत आहे. शरद जोशी यांच्या अफलातून घोषणा आणि कृतीचा विचार केला तरी आपल्याला वैचारिक गोंधळाची बऱ्यापैकी कल्पना येवू शकते.

मत मागायला आलो तर जोड्यानं मारा !

( मात्र.. जोशी स्वतः निवडणुकीला उभे राहिले )

सरकार क्या समस्या सुलझाएगी, सरकार ही समस्या है !

( राज्यसभेवर जाण्यासाठी जंग जंग पछाडले. शिवाय स्वतःची पार्टी काढून निवडणुका लढविल्या.. )

सत्ताधारी मोठे चोर, विरोधी पक्ष छोटे चोर ! मोठ्या चोराला धडा शिकवण्यासाठी छोट्या चोराला मदत करावीच लागते !

( राज्यसभेच्या निमित्ताने मोठ्या चोरांच्या कळपात स्वतःच सामील झाले )

हिरवी गिधाडे, भगवी गिधाडे, निळी गिधाडे

( बहुसंख्य वेळा भाजपाच्या सोयीची भूमिका घेतली. भगव्या गिधाडांच्या कळपात सामील झाले. )

आम्ही आमच्या पुरते पिकवू !

( ऐकायला आकर्षक वाटत असला तरी व्यवहारात पोरकट असलेला अचाट विचार.. कधीही उपयोगात आणण्याची हिम्मत केली नाही. का ? )

गोहत्या बंदी बद्दल वरवर विरोध दाखवायचा, हे शेतकऱ्यासाठी योग्य नाही असं बोलायचं, पण लगेच मभावनेच्या आडूनफ त्या कायद्याचे समर्थन देखील करायचे, ही कोणती वैज्ञानिक भूमिका असावी ? असा सारा दुटप्पीपणा शरद जोशी यांच्या लिखाणात आणि वागण्यात ठासून भरला होता.

मात्र शेतकरी संघटनेत अनेक नेते, कार्यकर्ते प्रामाणिकपणे शेतकऱ्यांच्या हितासाठी आयुष्यावर निखारे ठेवून सहभागी झाले होते. त्यातले अनेक बर्बाद झालेत. अनेकांचे संसार उद्धवस्त झालेत. अनेकांचा भ्रमनिरास झाला. दुटप्पीपणा बघून त्यांनी आपापले मार्ग शोधले. काही राजकीय दृष्ट्या यशस्वी झालेत, काही अजूनही टिकून आहेत, तर काही निराश होऊन घरी बसलेत. आणि उरलेले मात्र अजून जोशी यांची पालखी घेवून नाचत आहेत.

यात कृषीसेवा केंद्र वाल्यांनी मात्र हात धुवून घेतलेत. असो.

शरद जोशी यांनी असंघटित असलेल्या शेतकऱ्यांना संघटित करून एका क्रांतीच्या दिशेनं वाटचाल केली, असं बऱ्याच भाबड्या विचारवंतांना त्यावेळी वाटायला लागलं होतं. आपण तसेही भोळे आहोत. चिकित्सा आपल्याला नको असते. भक्ती हा आपला खास स्वभाव आहे ! आणि त्यातूनच नकळत अंधभक्तिकडे वाटचाल सुरू होते. शरद जोशी यांच्या मांडणीत असलेला विरोधाभास आणि भोंगळपणा त्यामुळेच लोकांच्या लक्षात आला नाही. अशिक्षित शेतकऱ्यांना त्यासाठी दोष देता येणार नाही, पण विचारवंतांना देखील समजू नये, ही खरी शोकांतिका आहे. शरद जोशी यांनीही तशी पुरेपूर काळजी घेतली. कधी शेगाव, कधी पंढरपूर, कधी फुले, कधी महिलांच्या नावाने सातबारा.. असे बेमालूम मिश्रण ते करत राहिले. पण नेमक्या वेळी महिला आरक्षणाला मात्र त्यांनी राज्यसभेत विरोध केला. हेही विसरता येणार नाही. म्हणजे शरद जोशी यांचे खरे रूप कोणते होते ?

मते मतांतरे असू शकतात. पण शरद जोशींनी शेतकऱ्यांच्या नावानं महाराष्ट्रात एक झंझावात निर्माण केला होता, यात संशय नाही. मात्र एकदा भ्रमनिरास झाला, विश्वासघात झाल्याची जाणीव लोकांना झाली की, नंतरची अनेक वर्ष पुन्हा अशी आंदोलनं उभी राहू शकत नाहीत, हे भयानक वास्तव मान्य करावेच लागेल. ही भीती तेव्हाही मी बोलत होतो. त्या अर्थानं महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनाची जी हानी झाली, ती भरून निघायला आणखी किती वर्ष जातील सांगता येणार नाही.

पण कठोर आत्मचिंतन करून, झालेल्या चुका टाळून पुढे जाता येणार नाही का ? कुणीही परिपूर्ण नाही, चुका प्रत्येकाच्याच होतात, पण त्या दूर करून, नवी मांडणी करता येणार नाही का ? आपापला इगो बाजूला ठेवला, अंधभक्ती सोडली, शेतकऱ्यांच्या हिताचा वास्तविक विचार केला, तर कुठल्याही परिस्थितीतून नवा मार्ग काढता येवू शकतो, असं मला वाटते. असो..! तूर्तास एवढंच..!

**ज्ञानेश वाकुडकर**
**अध्यक्ष**
**लोकजागर अभियान**

# ग्रामपंचायत निवडणूक उमेदवारासाठी खर्च मर्यादा निश्चित

**भंडारा :** गोंदिया–भंडारा जिल्ह्यात १५ जानेवारी २०२१ रोजी होऊ घातलेल्या ग्रामपंचायत निवडणूकीसाठी सदस्य पदाच्या उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केली आहे. ग्रामपंचायत सदस्य संख्येवर आधारीत खर्च मर्यादा असणार आहे. ७ व ९ सदस्य २५ हजार, ११ व १३ सदस्य ३५ हजार आणि १५ व १७ सदस्य ५० हजार रुपये खर्च मर्यादा सदस्य पदाचे उमेदवाराकरीता निश्चित करण्यात आली आहे.नामनिर्देशन पत्र दाखल करावयाची तारीख २३ डिसेंबर २०२० ते ३० डिसेंबर २०२० सकाळी ११ वाजता ते दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. ३१ डिसेंबर २०२० रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी, ४ जानेवारी २०२१ अर्ज मागे घेण्याची तारीख, ४ जानेवारी २०२१ दुपारी तीननंतर चिन्ह वाटप व १५ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत मतदान व १८ जानेवारी रोजी मतमोजनी असा निवडणूक कार्यक्रम आहे. निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहणार आहे.उमेदवाराने नामनिर्देशपत्र दाखल करण्याच्या १ दिवस आधी निवडणूक खर्चाकरीता स्वतंत्र बँक खाते उघडून पासबुकची प्रथम पानाची झेराक्स प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करावी.

नामनिर्देशन पत्रासोबत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरीकांचा मागासप्रवर्ग या राखीव जागेसाठी रुपये १०० (रुपये शंभर फक्त) व सर्वसाधारण जागेकरीता रुपये ५०० (रुपये पाचशे फक्त) इतकी अनामत रक्कम रोखीने भरणे आवश्यक आहे.सदस्य पदाकरीता नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या उमेदवाराचे नाव सबंधीत ग्रामपंचायतीचे मतदार यादीत समाविष्ट असणे अनिवार्य आहे.नामनिर्देशपत्र दाखल करण्याऱ्या उमेदवाराचे वय २१ वर्षे पुर्ण असणे अनिवार्य आहे.



# आधुनिक सिद्धार्थ:कर्मयोगी संत गाडगेबाबा

हजारो वर्षांच्या इतिहासात धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि विविध क्षेत्रात जनजागृती घडवून आणणाऱ्या थोर महामानवांची ऐतिहासिक परंपरा या देशाला आणि या महाराष्ट्राला आहे. या महामानवांमध्ये मानवतेची सेवा करणारे, चालते – बोलते विद्यापीठ कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या नावाचा उल्लेख अग्रस्थानी करावा लागेल. कर्मयोगी संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ ला शेणगांव ता. दर्यापूर जि. अमरावती येथील अत्यंत प्रतिष्ठित झिंगराजी जानोरकर यांच्या घरात सखुबाई च्या पोटी झाला. पाळण्यातील नाव डेबू ठेवण्यात आले. पण हाच डेबू त्यांच्या कर्माने पुढे लोकोत्तर कर्मयोगी गाडगेबाबा होईल असे स्वप्नातही कोणास वाटले नसेल. डेबूचे वडील झिंगराजी. यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे समाजात मान – मरातब होता. परंतु नंतर रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, दैव – दैववाद, यातच गुरफटत जावून दारूच्या आहारी गेले. शेवटी फुफ्फुसाच्या आजाराने ग्रासले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. परंतु मृत्यू पूर्वी झिंगराजी त्यांच्या पत्नीला म्हणाले, सखु महा कारभार आटपला! मराले शेवटी लोकांच्या उंबरठ्यात येवून पळालो! मानमराद्याले सोडल्यानं आपल्या संसाराचे कोयसे झाले. महा आईक आताच्या आता तो खंडोबा, ती आसराई, ते सर्व देवपाटातले दगडगोटे दे फेकून भुले नदीत. आणखीन एक, आपल्या डेबुले या देव– देवी आणि देव कार्या पासून दूर राहू दे. या खोट्या देवाले कोंबड्या–बकऱ्यांना इनाकारण कापण्याच्या फंदात मी पळालो नसतो तर दारूच्या नादात कायले गोवलो असतो? पण आता माह्या डेबूला सांभाळ ? तो देवाले न माननारा झाला तरी चालेल पण त्याले बकरे खाऊन, अन् दारू पिऊन देवाचा नाद नको लागू देवू बरं. हे बोलणं लहानगा डेबू ऐकत होता व याचा परिणाम त्यांच्या बालमेंदूवर झाला म्हणूनच ते कर्मयोगी होऊ शकले.

वडिलांनी मृत्यूच्या वेळी जे सांगितले होते ते डेबूजीच्या मनात खोलवर रुजल्या गेले होते. कारण मुलीचा बारसा करण्याच्या वेळी रूढी, परंपरांच्या विरोधात जावून दारू व कंदुरीचे जेवण न करता, गोड जेवण करण्याचा निर्णय घेतला होता. ही वार्ता जेव्हा समाजाला कळाली तेव्हा डेबूजीला विरोध केला. जातीच्या बाहेर काढण्याच्या धमक्या दिल्या. परंतु कशालाही न जुमानता डेबुजीने परंपरा, दैव– दैववाद, अंधश्रद्धा झुगारुन मुलीचा बारसा साजरा केला. अत्यंत असा क्रांतिकारक निर्णय घेवून समाजाला एक चांगला संदेश दिला. वेळ, प्रसंग व संधी पाहून लोकांच्या परंपरावादी आचार–विचारांना धक्का देणाऱ्या कुशलतेनेच सुधारकांची खरी कसोटी लागत असते. गावात किर्तन असलं की डेबूजी किर्तनात जावून बसत. किर्तनकाराचे, या जगात दिन, दलित, दुबळे, पिडित, गरिबांची सेवा करा, ते दुःखाने ग्रासले आहेत, त्यांची दुःखातून मुक्ता करा! नेमके हे बोल डेबुजीला झोंबू लागले. सिद्धार्थ गोतमाच्या मनात सुद्धा जगात दुःख आहे व त्याचा मार्ग शोधला पाहिजे हा विचार मनात आला, तेव्हा त्यांनी राजवैभव, बायको, एकुलता एक मुलगा, आई– वडिलांना सोडून, अंगावर साधे कपडे घालून राजवाड्या बाहेर पडले होते. हाच विचार डेबूजीच्या मनात घोळत होता. सिद्धार्थ गोतमा प्रमाणे समाजातीलच वाईट चालीरिती–परंपरांना नष्ट करण्याचा निश्चय व दुःखीतांची सेवा हीच ईश्वर सेवा, हेच यापुढचे कार्य त्यांनी ठरवले होते. आणि ०१ फेब्रुवारी १९०५ रोज बुधवारला रात्री पहाटेच्या वेळी पत्नी व आई सखुबाई झोपले असतांना आईच्या पायाला डोकं टेकून आशिर्वाद घेतले व साधे कपडे अंगावर घातले. अंगणातील गाडगा व काठी हातात घेऊन माघारी आई, बायको, मुलगा–मुलगी यांचा दुःखीतांच्या सेवेसाठी त्याग केला. अडिच हजार वर्षांनंतर आधुनिक भारतात डेबूजीच्या रुपाने सिद्धार्थ गोतमाचा जन्म होत होता. जसा सिद्धार्थ गोतम राजपुत्र होता, सुख लोळण घेत होते, तिच परिस्थिती डेबूजीच्या बाबतीत होती. कर्ज नाही की दारिद्र्य नाही की कौटुंबिक संघर्ष नाही. श्रीमती लोळण घेत होती. परंतु दुःखीतांना सुख मिळवून देण्याकरिता स्वत:च्या सुखाचा त्याग करून आधुनिक सिद्धार्थ घराबाहेर पडला. सिद्धार्थ गोतमा प्रमाणे डेबूजी सुद्धा रात्रंदिन फिरुन सर्व थरांतील समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक नि सांस्कृतिक जिवनाचे निरीक्षण करू लागले. अडल्या–नडल्यांना मदत करू लागले. लोकसेवेत स्वतःला झोकून दिले. जनसेवा करत असतानाच, दिवसा हातात खराटा घेऊन गाव स्वच्छ करणे आणि तथागता प्रमाणे पोटापुरते अन्न मागणे, हा त्यांचा एककलमी कार्यक्रम सुरू असे. दिवसा रस्त्यावरील घाण काढल्यानंतर रात्री किर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या मेंदूतील धार्मिक गुलामी व वाईट विचारांची घाण काढण्याचे काम करत असत.

आता लोक त्यांना डेबूजी ऐवजी गाडगेबाबा म्हणू लागले. गाडगेबाबा आपल्या किर्तनातून बुवा– बापू सारखे देव–देवता, व्रत– वैकल्ये व गंगा स्नान यांचे स्तोम माजवायला सांगत नसत तर, हे सर्व निरर्थक कर्मकांड आहेत, बापहो यापासून दूर रहा, यावर खर्च न करता पोरांना शिकवा, असा संदेश किर्तनातून देत असत.

कर्तनात संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा आधार घेऊन ते जातियतेवर टिका करतांना म्हणत....

महारासी शिवे, विटाळ होय
कोपे तो, ब्राम्हण नव्हें

गाडगेबाबांना जावून ६५ वर्ष होत आहेत, तरी सुद्धा आमच्या मनातून जातियतेचा विष काही कमी झाला नाही. एवढे आम्ही नालायक आहोत.

लोकांची दिशाभूल करून स्वतःला साधू म्हणवणाऱ्यांचे ढोंग उघडे पाडतांना ते म्हणत.......

तिर्थवासी गेले आणि दाढी मिशी बोलून आले
पाप अंतरातले नाही गेलें दाढी मिशी ने काय केले
शेंदूर माखूनिया धोंडों पाया पडती पोरे रांडा
नवसे कन्या पूत्रे होती मग का करणे लागे पती

अशा पद्धतीने किर्तनातून नवस, अंधश्रद्धा यावर टिका करत. कोणत्याही प्रकारचे शालेय शिक्षण न घेता आजच्या डॉक्टर, इंजिनिअर, वकिल, प्राध्यापक, शिक्षकांना लाजवेल असा विज्ञानवाद लोकांच्या मनात रुजवत. जत्रा– यात्राच्या संदर्भात संत कबिराच्या दोह्याचा दाखला देत ते म्हणत.....

जत्रा में फतरा बिठाया, तिरथ बनाया पाणी, दूनिया भई दिवानी, पैसो की धुलदाणी

आणि पुढे सांगत माय– बापहो तुमचे देव घरिच आहेत, तुमच्या माय– बापाची सेवा हीच ईश्वर सेवा आहे. गाडगेबाबांची वाणी ही अनुभवपूर्ण होती. अनुभवाशिवाय त्यांच्या मुखातून एकही शब्द बाहेर पडत नसे. एखाद्या कुशल समाजशास्त्रज्ञनाप्रमाणे सामाजिक प्रश्न बाबा सोडवित, म्हणून त्यांचे किर्तन ऐकायला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील उपस्थित रहात असत.

बाबांचा आपल्या कर्मावर आणि हातावर कष्ट करण्यावर विर्श्वास होता. आध्यात्मापेक्षा व्यवहाराचा त्यांना अधिक आदर होता. कपोलकल्पित कथा – पुराणांवर त्यांचा विश्वास नव्हता. बाबा दरवर्षी एकादशीला पंढरपूरला लोकसेवा करण्याकरिता जात. परंतु त्यांनी आयुष्यात एकदासुद्धा मंदिरातील विठ्ठलाचे दर्शन घेतले नाही. नव्हे कधीच कुठल्या मंदिरात जाऊन देवाच्या पाया पडले नाहीत. मात्र आज आपण मंदिरासाठी माणसांचे मुडदे पाडायला तयार आहोत. हाच का आमचा गाडगेबाबांचा वारसा....?

बाबांनी मनात आणलं असतं तर प्रचंड संपत्तीचा संग्रह करू शकले असते. परंतु लोकसेवा आणि लोकसंग्रह ज्यांना आवडतो त्यांना संपत्ती कधीच आकर्षीत करु शकत नाही. तथागतांनी ज्ञानदानाचे कार्य केलं तर बाबांनी लोकसेवेचे. *अशा लोकोत्तर कर्मयोगी व आधुनिक जगाच्या सिद्धार्थ गोतमाचा महापरिनिर्वाण २० ऑक्टोबर १९५६ चा बौद्ध धम्मचक्र परिवर्तनाचा दिक्षा सोहळा पाहूनच २० डिसेंबर १९५६ ला झाला.

**अनिल भुसारी , तुमसर,**
**जि. भंडारा ८९९९८४३९७८**

# राज्य सरकारच्या विरोधात भाजपचे तिरोड्यात धरणे आंदोलन



**तिरोडा:–** राज्यातील महाविकास आघाडी सरकारच्या विरोधात आणि शेतकरी व नागरिकांच्या चुकीच्या धोरणाचा विरोध करण्यासाठी तिरोडा–गोरेगाव मतदारसंघाचे आमदार विजय रहांगडाले यांच्या नेतृत्वात तहसिल कार्यालयावर मोर्चा काढून धरणे आंदोलन करण्यात आले. महाविकास आघाडी सरकारच्याविरोधात घोषणा देण्यात आल्या. तर केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या कृषी धोरणांचे समर्थन करण्यात आले.

या आंदोलनात भाजप जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर, तिरोडा नगराध्यक्ष सोनाली देशपांडे, शहरभाजप अध्यक्ष स्वानंद पारधी, जिल्हा महामंत्री मदन पटले, बाजार समितीचे सभापती चिंतामण रहांगडाले, माजी सभापती वाय.टी.कटरे, पिंटु रहांगडाले, भाऊराव कठाणे, माजी आमदार भजनदास वैद्य, डॉ.वसंत भगत, भाजयुमो जिल्हाध्यक्ष ओम कटरे आदी भाजप नेते मंचावर उपस्थित होते.

या मागण्यासांठी धान उत्प–ादक शेतक–यांचे आधारभूत धान खरेदी केंद्रावर धान खरेदी न करणे, वेळेवर सात बारा उप–लब्ध न होणे, शासकीय धान खरेदी केंद्रावर बारदाना उपलब्ध न होणे परिणामी शेतकऱ्यांना एक महिना वाट बघावी लागणे, ज्याशेतकऱ्यांच्या शेतीमध्ये मावा तुडतुडाचे नुकसान झाले नाही अशा शेतक–यांचे धान विक्रीची मर्यादा १३ क्विंटल ऐवजी ३३ क्विंटल धान खरेदी करणे, धान खरेदीकरिता आनलाईन नोंदणीची जवाबदारी शासनातर्फे करणे, एकत्रित सातबाराखातेधारकांना सहमतीपत्राची अट रद्द करणे, हमाली कमी करणे, ४० किलो वर १.५ किलो सोख कपात करणे,विक्री केलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ देयके देण्यात यावे, पिक विम्याची रक्कम वेळेवर देणे,कोव्हीड –१९ कालावधीतील विजबिलाट सुट देण्याबाबत शास–नाने सप्टेंबरमध्ये घोषणा केली होती परंतु त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नसल्यामुळे जनतेवर विजबीलाचा आर्थिक बोजा निर्माण झालेला आहे. यावर तोडगा काढून कोव्हीड–१९ कालावधीतील वीजबिलात शासनाने सूट देण्यात यावी, पूरग्रस्तांना पूर्णपणे मदत देण्यात यावे यासाठी हे आंदोलन करण्यात आले.

# साकोली येथील कृषी महाविद्यालयाच्या जागेचा प्रस्ताव तात्काळ सादर करा-नाना पटोले



**साकोली:** येथील प्रस्तावित कृषी महाविद्यालयासाठी आवश्यक असलेल्या चाळीस हेक्टर जागेचा संपूर्ण प्रस्ताव येत्या दोन दिवसांत सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र विधासभेचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्या. प्रस्तावित कृषी महाविद्यालय साकोली येथील आलेबेदर येथे सुरु करण्यात येत आहे. या महाविद्यालयासाठी चाळीस हेक्टर जागेची आवश्यकता असून यासंबंधिचा प्रस्ताव महसूल विभागातर्फे वन विभागाला सादर करण्यात आला आहे. वन व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी या जागेची संयुक्त पाहणी करुन सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश यावेळी नाना पटोले यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात कृषी महाविद्यालयाच्या जागेसंदर्भात विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस भंडाऱ्याचे जिल्हाधिकारी संदीप कदम, प्रादेशिक वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक कल्याण कुमार, महसूल उपायुक्त मिलिंद साळवे, अतिरिक्त जिल्हाधिकारी निशिकांत सुके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मून, साकोलीचे उप विभागीय अधिकारी मनीषा दांडगे, भंडारा वन विभागाचे उपवनसंरक्षक एस. डी. भलावी आदी उपस्थित होते.

साकोली येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्यात येत असून यासाठी महसूल विभागातर्फे मौजा आलेबेदर (रिठी) या गावातील चाळीस हेक्टर जा–गेचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या जागेसंदर्भात वन विभागातर्फे वनसदृष्य जंगल अथवा वन विभागाच्या नोंदीनुसार मालकी हक्कासंदर्भात तपासणी करुन या संदर्भातील प्रस्ताव येत्या तीन दिवसांत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तयार करण्याच्या सूचना करताना विधानसभा अध्यक्ष श्री. पटोले यांनी जागेच्या हस्तांतरणासाठी आवश्यक असलेल्या परवानगीसंदर्भातही वन विभाग व महसूल विभाग यांनी संयुक्तपणे जागेची पाहणी करुन शासन मान्यतेसाठी प्रस्ताव तयार करावा, असेही या बैठकीत ठरले. जिल्हाधिकारी संदीप कदम यांनी प्रस्तावित कृषी महाविद्यालयासाठी आवश्यक असलेल्या जागेसंदर्भात प्रस्ताव तयार करण्यात आला असल्याची माहिती यावेळी दिली.

# आता कृषी मालांसाठी विमानसेवा



**भंडारा:** शेतकऱ्यांच्या उत्पादित कृषी मालाच्या सुलभ वाहतुकीसाठी रेल्वे विभागाने किसान रेल्वे सुरु केली. किसान रेल्वेसाठी पुढाकार न घेणारे खासदार आता विमान सेवेद्वारे कृषी मालाची वाहतूक करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

भंडारा–गोंदिया जिल्ह्यातील उत्पादने हवाई मार्गाद्वारे कमी वेळेत बाजारपेठेत पोहोचवून क्षेत्राचा आर्थिक विकास करण्याचे उद्दीष्ट ठेवून खासदार सुनील मेंढे यांनी बिरसी विमानतळ येथे बैठक घेतली. या बैठकीत फळ उत्पादनाचा आढावा घेऊन गोंदिया जिल्ह्यातून आंबे, टरबूज, सीताफळ, पेरु आदी फळांचे ९,८३८ मेट्रीक टन उत्पादन घेलल्याचे त्यांनी सांगितले. ही उत्पादने नागपूर व जबलपूर येथे पाठविल्या जातात. भेंडी, काकडी, टोमॅटो, कारली या भाज्याचे निर्यातक्षम उत्पादने वाढविण्याबाबत आणि ही नाशवंत उत्पादने विमान वाहतुकीद्वारे कमी वेळात बाहेरील बाजारपेठेत पाठवणे शक्य होणार असल्याचे खा.मेंढे यांनी गोंदिया विमान प्राधिकरणासोबत झालेल्या बैठकीत सांगितले.

अधिकाऱ्यांची कानउघाडणी

किसान रेल्वे सुरु होण्याच्या हालचाली सुरु असताना भंडाऱ्यात थांबा नसल्याचे वृत्त प्रकाशित होताच दक्षिण पूर्व मध्य रेल्वेने याची दखल घेत भंडाऱ्यात थांबा दिला. त्यापुर्वी रेल्वेचे अधिकारी भंडाऱ्यात व्यापाऱ्यांशी चर्चा करण्यासाठी आले असता खासदारांची आपल्याला वगळून हे काम करीत असल्याचे सांगत त्या अधिकाऱ्यांची चांगलीच कान उघाडणी केली होती. त्यावेळी आलेल्या अपयशामुळे आता विमान सेवेने कृषी माल आयात करण्याचा खटाटोप करीत असल्याचा आरोप जनतेकडून होत आहे.

**विमानापेक्षा रेल्वेने लवकर वाहतूक**

भंडारा ते जबलपूर हे अंतर रेल्वेने ३०० किमी इतके आहे. त्यासाठी रेल्वेला केवळ सहा तास लागतात. विमानासाठी हाच प्रवास कमी वेळेचा असला तरी विमानाने कृषी माल पाठविण्यासाठी चार तासापुर्वी नेऊन द्यावा लागेल. त्यानंतर विमान उडेल आणि गंतव्य ठिकाणी पोहोचल्यानंतर विमानतळातून हा कृषी माल नेण्यासाठी पुन्हा तासंचा वेळ जाणार आहे. विमानाचा प्रवास कमी वेळेत होत असला तरी त्यासाठी प्रवासापुर्वी आणि नंतर फार वेळ जात असल्यामुळे हा कृषी माल पोहोचण्यासाठी १० तासांवर वेळ जाणार आहे. कृषी मालाची हिच निर्यात जर विदेशात होत असेल तर ही वाहतुक सोयीची ठरणार आहे.

# कार्गो एयर बससेवेने विदेशात जाईल शेतकऱ्यांचा कृषीमाल



**गोंदिया:** शेतकरी उत्पन्न घेत असलेल्या फळ, भाजीपाला व इतर कृषीमालाला चांगली बाज–ारपेठ उपलब्ध करून देणे व योग्य दर मिळून त्यांचे जीवनमान उंचविण्याच्या दृष्टीने कार्गो एयर बस सुरू करण्याच्या दिशेने प्रयत्न केले जात आहेत, असे खासदार सुनील मेंढे म्हणाले.

या विषयाला घेऊन शनिवार, १९ डिसेंबर रोजी गोंदिया तालुक्यातील रायपूर येथे डॉ.भालचंद्र ठाकूर यांच्या फार्म हाऊसमध्ये फळ–भाजी उत्प–ादक शेतकऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी मेंढे बोलत होते. मेंढे पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांचे सकारात्मक समर्थन बघूनच गोंदियातून कार्गो सेवा सुरू होईल व शेतकऱ्यांचे उत्पादन विदेशात जाईल.

गोंदिया विमानतळाच्या माध्यमातून कार्गो एयर बस सेवा सुरू करण्याबाबत मेंढे यांनी लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या विजयानंतर सांगितले होते. या विषयाला घेऊन यापूवी अधिकाऱ्यांसह बैठक झाली आहे. बैठकीत विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी विनय तांब्रपाल, डॉ. भालचंद्र ठाकूर, गजू फुंडे, उमेन्द्र बिसेन, छत्रपाल बिसेन, प्रफुल बांडेपूचे, प्रवीण कापगते, यू.आर. बिसेन, प्रभू धारगाये व जवळपास ५० शेतकरी उपस्थित होते.

भंडारा–गोंदिया जिल्ह्यात उत्प–ादन होणाऱ्या फळ–भाजी व पिकांची माहिती शेतकऱ्यांनी दिली. शेतकऱ्यांनी सांगितले की, जिल्ह्यात मिरची, काकडी, लौकी, केळे, टरबूज आदींचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न होते. या सर्व कृषी मालाच्या उत्तम बाजारपेठेसाठी कार्गो एयर सेवा महत्वपूर्ण सिद्ध होईल. या बैठकीत कृषी कायद्यांवरही चर्चा करण्यात आली.

# वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांवर हल्ला



**भंडारा:** प्रतिबंधीत क्षेत्रातून वाहन जाऊ देण्यावरून हंगामी कर्मचाऱ्यांसोबत सुरू असलेल्या वादात मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांवर वाहन चालकाने हल्ला केला. ही घटना कोका अभयारण्याच्या चंद्रपूर गेटवर रविवारी (दि.२०) रात्री ७.३० वाजताच्या सुमारास घडली. यात वनपरिक्षेत्र अधिका?याचा हात फॅक्चर झाला असून एका आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन शंकर जाधव असे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याचे नाव आहे. तर राहूल चौरसिया याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोका वन्यजीव अभयारण्या रात्रीच्यावेळी वाहन जाण्यास प्रतिबंध आहे. रविवारी दुपारी ३ वाजता वाहन क्रमांक एमएच ४० बीजे ९७९७ चंद्रपूर गेटवरून चंद्रपूर गेटवर नोंद करून कोका गावाकडे गेले. रात्री ७.३० वाजताच्या सुमारास हे वाहन परत आले. त्यावेळी चंद्रपूर गेटवरील हंगामी मजुरांनी वाहन जावू देण्यास मनाई केली. त्यावरून वाद सुरू झाला.

या वादात कोका येथील वाहन चालक अमर वाघाडे याला मारहाण करण्यात आली. त्यांच्या डोळ्याला मार लागला. वनपरिक्षेत्र अधिकारी जाधव यांचे निवासस्थान चेकपोस्ट नजीक असून भांडणाचा आवाज आल्याने ते त्या ठिकाणी गेले. भांडणात मध्यस्थी करीत असताना राहूल चौरसिया याने त्यांच्यासोबतही वाद घातला. मध्यस्थी करीत असताना राहूल चौरसियाने जाधव यांच्या खांद्यावर जोरदार प्रहार केला. त्यात त्यांचा खांदा फॅक्चर झाला. त्यांना तात्काळ भंडाराच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तर कारधा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. त्यावरून आरोपी राहूल चौरसिया याच्याविरूद्ध शासकीय कामात अडथडा आणण्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा तपास सहायक पोलिस निरीक्षक सुनील केवट करीत आहे.

# पेट्रोल डिझेलची भाव वाढ केंद्र शासनाने मागे घ्यावी-राष्ट्रवादी काँग्रेस



**कोसमतोंडी:** राष्ट्रवादी काँग्रेस पाटी पदवीधर संघटनेच्या वतीने पेट्रोल व डिझेलच्या वाढत्या किमंती कमी करण्यासाठी केंद्र शासनाला निवेदन पाठवण्यात आले. केंद्र शासनाच्या वतीने पेट्र ोलजन्य वस्तूच्या किंमतीत भरघोष भाव वाढ केलेली आहे. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य जनतेचे आर्थिक शोषण होत आहे. वाहतूक खर्चव लागवड खर्चात वाढ झाल्याने प्रत्येक वस्तूच्या किमती वाढलेल्या आहेत. परिणाम ी जनतेला कोविड सारख्या महान संकटात जीवन जगणे कठीण झाले आहे. याकरिता राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी सडक अर्जुनी पदवीधर संघटना, राष्ट्रवादीतालुका सडक अर्जुनी, युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने तहसीलदार उषा चौधरी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदन देताना माजी जि.प.सदस्य गंगाधर परशुरामकर, रमेश चुरे, तालुकाअध्यक्ष अविनाश काशिवार,पदवीधर तालुका अध्यक्ष उमराव मांढरे, दिनेश कोरे,रजनी गिऱ्हेपूंजे, ऐफ.आर.टि शहा,मिलन राऊत, शिवाजी गहाने , नरेश चौव्हान , भुमेस्वर चौव्हान, अनिल फरदे, दिलीप गभने, देव–ाजी बनकर, सुभास कापगते,अमिन शेख आदी उपस्थित होते.

# ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रोग्रामरची आत्महत्या

**गोरेगाव:** तालुक्यातील खाडीपार येथील रहिवाशी संदीप कन्हैयालाल हरिणखेडे (वय २७) याने त्रस्त होऊन आत्महत्या केली. पत्नीच्या तक्रारीवर पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.प्रांजू संदीप हरिणखेडे (१९) यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे पती संदीप हरिणखेडे भंडारा येथील ग्रामीण विकास विभागात प्रोग्रामर पदावर कार्यरत होते. संदीपला एनजीओच्या दोन लोकांनी ग्रामीण विकास विभागात रिक्त पदांच्या भरतीसाठी प्रत्येक युवकाकडून २० ते २५ हजार रुपये घेण्यासाठी सांगण्यात आले. या रकमेतून स्वतःकडे ५ हजार रुपये ठेवणे व उर्वरित रक्कम आरोपींना देण्यास सांगण्यात आले होते.संदीप याने नोकरीसाठी युवकांकडून रक्कम घेतली व आरोपींच्या खात्यात सीडीएम मशीनच्या माध्यमातून घातली होती. युवकांनी रक्कम दिल्यानंतर नोकरी न लागल्यामुळे संदीपवर रक्कम परत मागण्यासाठी दबाव निर्माण केला. त्या युवकांना नोकरी न लागल्यामुळे संदीपने रक्कम परत करण्यासाठी अनेकदा आरोपींकडे पैशाची मागणी केली. परंतु, आरोपींनी म्हटले की, त्यांनी आम्हाला रक्कम दिली नाही. रक्कम दिली तर त्याचा पुरावा दाखविण्यात यावा. आरोपींकडून रक्कम परत मिळत नसल्यामुळे संदीप मानसिकरित्या त्रस्त झाला व त्याने आत्महत्या केली. प्रांजूने आपल्या तक्रारीत म्हटले की, तिच्या पतीच्या आत्महत्येचे कारण ते आरोपी आहेत. त्यांनी नोकरीच्या नावावर पैसे घेऊन युवकांची फसवणूक केली आहे. तिच्या पतीला फसविण्यात आले असून आरोपींनी पैसे स्वतः हजम केले आहे.गोरेगाव पोलिसांनी या प्रकरणात आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ३०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक वंजारी करीत आहेत.

# रेल्वेच्या महिला कर्मचाऱ्यांशी छेडछाड करुन केली मारहाण

**गोंदिया :** दक्षिण–पूर्व–मध्य रेल्वेच्या अर्जुनी–मोरगाव रेल्वे स्थानकावर तैनात महिला रेल्वे कर्मचाऱ्याशी छेडछाड करून मारपीट करण्यात आली. ही घटना १९ डिसेंबर रोजी घडली. या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला २४ तासांच्या आत अटक केली आहे. आरोपी अर्जुनीच्या आंबेडकर चौकातील रहिवासी असून लोकेश अशोक लाडे (वय ३२) असे त्याचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध गोंदिया रेल्वे पोलीस ठाण्यात भादंविच्या कलम ३५३, ३५४, ४४८, ३२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



रेल्वे पोलिसांनी दिलेल्या म ाहितीनुसार, दक्षिण–पूर्व–मध्य रेल्वेच्या अर्जुनी–मोरगाव रेल्वे स्थानकावर महिला कर्मचारी आपली ड्यूटी करीत होती. या दरम्यान अचानक आर–ोपीने कार्यालयात प्रवेश केला. त्याने सदर महिला कर्मचाऱ्याच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करून छेडछाड केली व तिला मारहाणही केली. आरोपीविरुद्ध गोंदिया रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आरोपीचा शोध सुरु केला व २४ तासांच्या आत त्याला अटक केली. आरोपी भंडारा जिल्ह्याच्या लाखांदूर पो–लीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या मांडल गावात लपलेला होता, असे सांगण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सी.एम. राजकुम ार, उपविभागीय पोलीस अधिकारी एस.व्ही. शिंदे यांच्या मार्गदर्शनात पो–लीस निरीक्षक अनीता खेडकर, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण भिमटे, पोलीस हवालदार किशोर ईश्वर, नंदा माने, चंद्रकांत भोयर, नंदकिशोर नारनवरे, ओमप्रकाश सेलोटे, अखिलेश रॉय, मनोज गौतम यांनी केली.

# महामार्गाचे काम निकृष्ठ दर्जाचे-आमदार चंद्रिकापुरेंनी केली कंत्राटदारांची कानउघडणी



**अर्जुनी मोर :** अर्जुनी मोर. विधानसभा क्षेत्राचे आमदार मनोहरराव चंद्रिकापुरे यांनी दि.२१ ) तालुक्यातील दौऱ्यात कोहम ारा–वडसा मार्गावर सुरु असलेल्या रस्ता बांधकामाची नवेगांवबांध जवळ पहाणी केली असता सदर काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याचे दिसून आले. याबाबत कामावरील लोकांना त्यांनी विच–ारपुस करीत कंत्राटदार सुविधा पुरवित नसल्याची बाब निदर्शनास आली. सदर रस्त्याचे काम मजबूत व सुव्यवस्थित होत नसल्याने अपघाताला कारणीभूत ठरत असल्याची बाब लक्षात आली. याबाबत आमदार मनोहरराव चंद्रिकापुरे यांनी लगेचच संबधित अधिकारी व कंत्राटदाराना विच–ारपुस करुन चांगलीच कानउघडणी केली. यापुढे असे निकृष्ठ दर्जाचे काम खपवून घेतल्या जाणार नाही अशी तंबी दिली.

कोहमारा–वडसा मार्गाचे काम अनेक महिन्यापासून कासवगतीने सुरु आहे. व सदर काम सुव्यवस्थित होत नसल्याच्या अनेक लोकांच्या आमदार महोदयाकडे तक्रारी होत्या .या मार्गाने मोठ्या प्रमाणात वाहनांची रहदारी असल्याने वाहन चालकांना कमालीचा त्रास होत आहे. त्यातही मजबूत रस्ताबांधकामाच्या नावावर निकृष्ठ दर्जाचे काम होत असल्याने आमदार मनोहरराव चंद्रिकापुरे यांनी संबधित अधिकारी व कंत्राटदार यांना चांगलेच धारेवर धरले.

# लेकरांचे व सासू सास-याचे सांभाळ करित पीएसआय पदापर्यंत पोहोचली-प्रियंका मेश्राम डोंगरे



**गोंदिया:–** दोन लेकरांचा व सासू सास–यांचा सांभाळ करित अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत जिद्दीने असंख्य संकटाचा सामना करीत पी.एस.आय .पदापर्यंतचा माझा प्रवास खडतर होता. परंतु आजपर्यंत म्हटले जायचे, की एका यशस्वी पुरुषांच्या यशामागे एका स्त्रीचा हात असतो. आज एका यशस्वी स्त्री च्या पाठीमागे एका पुरुषाचा हात असतो हे माझे पती दिनेश डोंगरे यानी दाखवून दिले तर माझे मामा प्रा. विनोद माने यानी सतत मार्गदर्शन करुन आदर्श स्थापित केला, त्यामुळेच यश संपादन करु शकली असे मनोगत आमगाव तालुक्यातील नवनियुक्त प्रथम महिला पीए–सआय प्रियंका मेश्राम (डोंगरे) यानी व्यक्त केले. संविधान मैत्री संघ व अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त वतीने क्रांतीकारी संत गाडगेबाबा स्मृतीदिना निमित्त आयोजीत जनजागर कार्यक्रमात त्या बोलत होत्या. स्थानीक चंद्रशेखर वार्डातील एम.जी.पैरामेडीकल कॉलेज हॉल येथे द्विमासिक संविधान जागर कार्यक्रमाअंतर्गत गाडगेबाबा स्मृती दिनानिमित्त आयोजित जागर कार्यक्रमात नवनियुक्त पीएसआय प्रियंका मेश्राम डोंगरे यांचं संविधान मैत्री संघाच्या वतीने सत्कारपर अभिनंदन करण्यात आले.

प्रथम सत्रात प्रा.डॉ. दिशा गेडाम व प्रा. विनोद माने यांच्या संचालनामध्ये वक्तृत्व व काव्य स्पर्धा, समाजात उल्लेखनीय कार्य करणा–यांचे सत्कार असे विविध जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कर्मयोगी संत गाडगेबाबांची लोकजागृतीची पार्श्वभूमी स्वच्छता व अंधश्रद्धा या विषयावर आयोजित वक्तृत्व स्पर्धेत कु. चेतना रामटेककर हिने प्रथम, द्वितीय कु.पल्लवी चव्हाण व कु.सिमॉन भालाधरे हिने तृतीय क्रमांक पटकावला तर विज्ञानव–ादी संत गाडगेबाबा /गाडगेबाबांचे कीर्तनातील तत्वज्ञान या विषयावर आयोजित काव्य स्पर्धेत सीनियर गटात प्रथम सुरेंद्र जगने, द्वितीय किशोरकुमार बनसोड, कीरण वासनिक ज्युनियर गटात प्रथम नेहा पेंढारकर, द्वितीय स्नेहा मेश्राम, तृतीय जुही मेश्राम ठरले. विजेत्याना पारितोषिक म्हणून रोख रक्कम देण्यात आली. पाऊल कोटांगले, अंगद भालाधरे, अनामिका सतदेवे, आर्यन बनसोड, सक्षम लाऊल, पूनम मच्छीरके, निशा बोरकर, आयुष माने, पल्लवी चव्हाण आदि याना प्रोत्साहन पर नगद पूरस्कार देण्यात आले. परीक्षक म्हणून उमाताई गजभिये, माणिक गोंडाने व दिनेश डोंगरे यानी निर्णायक भुमिका बजावली.

द्वितीय सत्रात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने जिल्हा कार्याध्यक्ष अनील गोंडाने यांच्या अंधश्रद्धेवर जागर कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी अंनिसतर्फे प्रच–ारक डी.टी. कावळे, अमित उके, विनोद बनसोड प्रामुख्याने हज़र होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संविधान मैत्री संघाचे संयोजक अतुल सतदेवे,समता सैनिक दल प्रचारक महेंद्र कठाने, सर्वसमाज जयंती समिती चे पुरुषोत्तम मोदी, ज्येष्ठ नागरिक मित्र मंडळचे वसंता गवळी, विदर्भ बहुद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे सुषमा माने, संविधान मैत्री संघाचे संरक्षक दिनेश राऊत, लक्ष्मी राऊत, लायंदा लाडे, प्रतिमा रामटेके प्रामुख्याने उपस्थीत होते.

ज्यानी त्याग, प्रेम आणि सेवेने समाजातील दैन्य, दुःख घालविण्याचा कृतिशील प्रयत्न केला. थेट समाजाच्या अंगणापर्यंत खराटा नेला. त्याच खराटयाने अंधश्रद्धेवर प्रहार केले. समाजाला स्वच्छतेच्या सूर्याचे दर्शन घडविले, श्रमप्रतिष्ठेचे बिजारोपण केले, आरोग्याचा संदेश दिला, व्यसनम ुक्तीचा गजर केला. समाजातील विषमता, पाखंडता, कर्मकांड, मुळत: नष्ट केली. समता, प्रेम, बंधुभाव आणि न्याय निर्माण व्हावा म्हणून अखंड प्रबोधन केले. अशा या थोर कर्मयोगी, क्रांतिकारी संत गाडगेबाबांच्या स्मृतीदिनी सर्व मान्यवरानी मानवंदना दिली.

# नगर परिषदेने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाला ठोकले कुलूप



**गोंदिया:** नगरपरिषदेतंर्गत येत असलेल्या शासकीय कार्यालयासह अनेक व्यवसायिक प्रतिष्ठाने व नागरिकांनी कर थकविल्याने नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती कमकुवत झाली. अनेकदा नोटीस दिल्यानंतरही नागरीकासंह शासकीय कार्यालयांनी कराची रक्कम भरण्यास टाळाटाळ केल्याम ुळे मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण यांनी करवसुलीकरीता मोहिम राबविण्यास सुरवात केली. (ता.२१) राज्याचे नगरविकास व सार्वजनिक बांधकाम (उपक्रम) मंत्री हे गोंदियात असताना नगरपरिषदेच्या करवसुली पथकाने चक्क सार्वजनिक बांधकाम विभागातील रोहयोच्या कार्यालयालाच कुलूप ठोकल्याने खळबळ माजली आहे. विशेष म्हणजे आजच्या कारवाईत पालिकेने १० लाख १३ हजार रुपयांचा कल वसूल केला.


पालिका प्रशासनाच्या वतीने मालमत्ता कर देण्याची मागणी नोटिस देवून अनेक वेळा करण्यात आली. परंतु संबंधित टाळाटाळ करीत असल्याचे दिसून आले. मालमत्ता कर हा शहर विकासासाठी एक महत्वाचा स्त्रोत आहे. मात्र अनेक नागरिकांसह व्यापारी तसेच शासकीय मालमत्ता धारक वेळेवर कर भरीत नसल्याने शहर विकासाच्या कामात अडथडा निर्माण होत आहे. तसेच कराचा भरणा न केल्यामुळे व्यापाक जनहितास बाधा ठरत असल्याने मुख्याधिकाऱ्यांनी नगर परिषद, नगर पंचायत अधिनियमान्वय कर वसूलीची मोहिम राबविण्याला सुरुवात केली आहे.

यापुर्वी बीएसएनएल तसेच बँक ऑफ इंडिया व एक्सीस बँकेचे एटीएमच्या कार्यालयाला सुध्दा कुलूप ठोकण्यात आले होते. सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयावर १ एप्रिल २०१८ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत २ लाख २२ हजार ५४ रुपयाचे कर थकित होते. ते कर भरण्यास शासकीय कार्यालयानेच टाळाटाळ केल्याने नगरपरिषदेच्या विशाल बनकर या अधिकाऱ्याच्या नेतृत्वातील पथकाने ही कुलूप ठोकले.

यावेळी कार्यालयात आलेल्या कंत्राटदारासंह अनेकजण आश्चर्यचकीत झाले. एकंदीरत पालिकेने राबविलेल्या कर वसुलीच्या धडक मोहिमेने कर बुडविणाऱ्यांचे चांगलेच धाबे दण–ाणले आहेत.

# खा.पटेलांच्या पुढाकाराने नाट्यगृह व पार्किंग प्लाझा निधीचा मार्ग मोकळा







**गोंदिया:** निधी अभावी अडकून पडलेल्या रेलटोली परिसरातील नाट्यगृह तसेच शहर पोलीस ठाण्याच्या मागील बाजूला असलेल्या पार्कींग प्लाझाच्या पूर्णत्वाचा मार्ग आता सुकर झाला आहे. शहरातील महत्वाच्या या दोन प्रकल्पांसाठी खासदार प्रफुल्ल पटेल यांनी मध्यस्ती केली असून निधी उपलब्ध करवून दिला आहे. एवढेच नव्हे तर मागील ५ वर्षापासून रखडत चाललेल्या भूमिगत गटार योजनेचे काम लवकर पूर्ण करण्याचे निर्देश ही त्यांनी दिले आहे.

शहराच्या मध्यभागी रेलटोली परिसरात १२ कोटी ३६ लाख रुपये निधीच्या अंदाजपत्रकातून उभारण्यात येत असलेल्या नाट्यगृहाचे काम निधी अभावी अर्धवट पडून होते. हे काम पूर्ण करण्यासाठी ३ कोटी ५० लाख रुपयांच्या अतिरिक्त निधीची गरज बांधकाम विभागाला होती. ही बाब लक्षात घेत खासदार पटेल यांनी संबंधित विभागाच्या मंत्र्यांकडे पाठपुरावा करुन या कामासाठी दोन कोटी ५० लाख रुपयाचा निधी मंजूर करुन घेतला. हा निधी जिल्हाधिकाऱ्यांना प्राप्त झाला असून लवकरच नाट्यगृहाचे काम पूर्णत्वास येणार आहे. त्यचप्रमाणे मुख्य बाजारपेठेतील वाहन पार्किंगची समस्या मार्गी लावण्यासाठी असलेल्या पार्किंग प्लॉझाचे मागील २ वर्षापासून रखडले होते. हा विषय लक्षात घेत खासदार पटेल यांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा करुन माहिती घेतली असता एक कोटी रुपयांच्या निधीची गरज असल्याचे समजले. यासंदर्भात बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करुन याकरिता अतिरिक्त निधी लवकरच उपलब्ध होणार आहे. यामुळे पार्किंग प्लाझामध्ये येत असलेली निधीची अडचणही लवकरच सुटणार आहे.

याशिवाय शहरासाठी अत्याधिक महत्वाच्या असलेल्या व मागील ५ वर्षापासून निधी उपलब्ध असून सुद्धा रखडत चाललेल्या भूमिगत गटार योजनेच्या कामाला घेऊन खासदार पटेल यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगर परिषद अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी या प्रकल्पाला लवकरच पूर्णत्वास आणण्याचे निर्देश दिले. त्यानुसार योजनेच्या पहिल्या टप्प्यातील कामाला सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे भूमिगत गटार योजनेसाठी मोडकळीस येणारे रस्ते सुद्धा पूर्ववत करण्यात येणार आहेत.

**ग्रामीण रस्ते व घरकुल बांधकाम होणार**

विशेष म्हणजे जिल्ह्यातील रस्त्याचे जाळे आणखी सुदृढ व्हावे तसेच जिल्ह्यातील ग्रामीण भागांना विकासाच्या मुख्य प्रवाहात जोडण्याच्या उद्देशातून नवीन रस्त्यांचे बांधकाम लवकरच पूर्ण करण्यासाठी खासदार पटेल यांनी संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला आहे. एवढेच नव्हे तर पंतप्रधान आवास योजनेतील तिसऱ्या टप्प्याचा निधी आणि तिसऱ्या डीपीआरची निविदा उघडल्या नंतर लाभार्थ्याला घरकुलाचा लाभ घेता येईल असेही खासदार पटेल यांनी कळविले आहे.

# दहा वर्षात धानाला केवळ ७८८ रुपयांची वाढ



**गोंदिया–** शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी दरवषी शासन शेतमालाच्या आधारभूत किमती जाहीर करून त्यात वाढ करते. मागील दहा वर्षात धानाच्या आधारभूत किमतीत त्या–त्या सरकारने आजपर्यंत ७८८ रुपयांची प्रती क्विंटल वाढ केली. असे असले तरी जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीत फारसा बदल दिसून येत नाही. या तुलनेत बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरीत दुप्पट–तिप्पट वाढ झाल्याचे दिसून येते.

पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने खरीप व उन्हाळी हंगामात धानाचे उत्पादन घेतले जाते. गोंदिया जिल्ह्यात एकूण लागवड क्षेत्राच्या १ लाख ९० हजार हेक्टर क्षेत्रात खरीप हंगामात तर ३५ हजार हेक्टर क्षेत्रात उन्हाळी हंगामात धानाची लागवड केली जाते. धानाशिवाय इतरही पीक घेतले जाते, मात्र ते अत्यल्पच. जिल्ह्यात धानाचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न होत असले तरी यावर आधारित मोठे उद्योग जिल्ह्यात नाहीत. जिल्ह्यातील नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. यावर सुमारे ८० टक्के जनता निर्भर आहे. मागील काही वर्षांपासून जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकरी नैसर्गिक संकटाचा सामना करीत आहेत. शासनानेही वेळोवेळी शेतकऱ्यांना आर्थिक आधार दिला आहे. मात्र त्यांच्या प्रगतीत फारसा बदल झाल्याचे दिसून येत नाही. व्यापाऱ्यांच्या कचाट्यातून शेतकरी मुक्त व्हावा म्हणून शासनाची हमीभाव धान खरेदी योजना जिल्ह्यात सुरू आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांचे धान खरेदी केले जाते.

मागील दहा वर्षाच्या धानाच्या किमान आधारभूत किमतीत आतापर्यंत ७८८ रुपये प्रति क्विंटलने वाढ झाली आहे. सन २०११–१२ वर्षात साधारण धानाला १०८० रुपये प्रति क्विंटल दर होता. त्यानंतर तत्कालीन यूपीए शासनाने १७० रुपयांची दरवाढ केल्याने सन २०१२–१३ वर्षात १२५० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. २०१३–१४ मध्ये ६० रुपये, २०१४–१५ मध्ये ५० रुपये दर वाढ मिळाली. यानंतर केंद्रात भाजपा सरकार सत्तारूढ झाल्यानंतर त्यांनीही यूपीए सरकारच्या पावलावर पाऊल ठेवत सन २०१५–१६ मध्ये ५० रुपये, २०१६–१७ मध्ये ६० रुपये, २०१७–१८ मध्ये ८० रुपये आणि २०१९ ची लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून सन २०१८–१९ या वर्षात तब्बल २०० रुपये प्रति क्विं?टल वाढ केली. केंद्रात पुन्हा भाजपचे सरकार स्थापन झाले. त्यानंतर सन २०१९–२० मध्ये ६५ रुपये, २०२०–२१ मध्ये ५३ रुपये दरवाढ दिली.

आज साधारण धानाला १८६८ रुपये प्रति क्विंटल दर आहे. या तुलनेत बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरीत दुपट–तिपटीने वाढ झाली आहे. धान उत्पादनाच्या एकरी उत्पादन खर्चावर नजर टाकल्यास पूर्वमशागत १ हजार रुपये, शेणखत ४ हजार, बियाणे व पेरणी १५००, चिखलणी व रोवणी ४ हजार, खते व कीटकनाशके ५ हजार, कापणी, बांधणी व मळणी ४५०० रुपये असा एकूण १९ हजार रुपये खर्च येतो. आता मिळणाऱ्या उत्पादनावर नजर टाकू या, एका एकरात सरासरी १० ते १२ क्विंटल धानाचे उत्पादन होते. शासनाच्या हमी भावानुसार १८६८ ते २२४१६ रुपयाचे उत्पन्न मिळते. अर्थात खर्च व उत्पन्न सारखाच आहे. विशेष म्हणजे वर्षभर शेतकरी कुटुंबासह राबतो ते वेगळेच! विरोधक धानाला ३ हजार रुपये प्रति क्विंटल दर मिळावा यासाठी आंदोलन करतात. निवडणुकांमध्ये शेतकऱ्यांना मतदानाचा जोगवा मागतात. विरोधकांना शेतकरी मते देऊन निवडून आणून सत्तेवर बसवितात. परंतु यानंतर त्यांनाही त्यांनी केलेल्या आश्वासन व मागणीचा विसर पडतो.

**सानुग्रह अनुदानही प्रगतीत भर घालू शकला नाही**

उत्पादन खर्चाच्या तुलनेत धानाला हमीभाव कमी असल्याचे मान्य करून राज्यातील सरकार मागील काही वर्षांपासून दर खरीप हंगामात धानाला सानुग्रह अनुदान देत आहे. तत्कालीन फडणवीस सरकारने सन २०१७–१८ मध्ये ३०० रुपये, २०१८–१९ मध्ये ५०० रुपये तर महाविकास आघाडी सरकारने २०१९– २० मध्ये ७०० रुपये व यंदाही प्रती क्विंटल ७०० रुपये बोनस देण्याचे जाहीर केले आहे. गतवर्षी शेतकऱ्यांना प्रती क्विंटल २५१५ दर मिळाला. असे असले तरी त्याचा फायदा शेतकरी म्हणविणाऱ्या व्यापाऱ्यांनाच अधिक झाला. शेतकरी आजही आहे त्या स्थितीतच आहे.

# कृषी स्वावलंबन योजनेला आघाडी सरकाचा ब्रेक

**गोंदिया:** गत काळातील भाजपा सरकारने अनुसूचित प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्थानासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सुरू केली होती. मात्र विद्यमान महाविकास आघाडी सरकारने कोरोनामुळे ही योजना न राबविण्याचे ठरवित राज्य शासनाच्या कृषी विभागाने यासंदर्भातील आदेश जारी केले आहे. यामुळे गोंदिया जिल्ह्यातील शेकडो शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार आहे.




मागासवर्गीय शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन आणणारी ही योजना असून गेल्या दोन वर्षांपासून ही योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील ५ हेक्टर शेती असलेल्या शेतकऱ्यांना अडीच लाख रुपये विहिरीसाठी या योजनेचा लाभ देण्यात येतो. सोबतच २५ हजारापर्यंत कृषी पंप व १० हजार रुपये वीज जोडणीसाठी, जुनी विहीर दुरूस्तीसाठी ५० हजार, विहिरीत बोअर करण्यासाठी २० हजार, शेततळ्यात प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी १ लाख रुपयाचे अर्थसहाय्य देण्यात येते. यासाठी उत्पन्नाची वार्षिक दीड लाखांची मर्यादा घालून दिली आहे. ही योजना १०० टक्के शासन अनुदानाची आहे. गोंदिया जिल्ह्यात दरवर्षी ३०० ते ४०० शेतकरी या योजनेसाठी अर्ज करतात. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या अनुदानाच्या तुलनेत लाभार्थी निवड करण्यात येते.

साधारणत: २०० लाभार्थी शेतकरी या योजनेसाठी पात्र ठरतात. काही दिवसांपूर्वी या योजनेचे आभासी प्रणालीच्या माध्यमातून पात्र लभार्थ्यांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र राज्य शासनाच्या कृषी विभागाने वित्त विभागाच्या ५ मे २०२० च्या शासन निर्णयाचा संदर्भ देऊन कोरोनामुळे सन २०२०–२१ मध्ये योजना न राबविण्याचे आदेश जारी केले असल्यामुळे योजनेला ब्रेक लागला आहे. कोरोनामुळे राज्याचे उत्पन्न घटले असून आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. केवळ कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनेवरच मोठा खर्च करण्यात येत असल्यामुळे इतर योजनेच्या अनुदानाला राज्यातील महाविकास आघाडी सरकारने कात्री लावली आहे. मागासवर्गीय शेतकऱ्यांच्या जीवनात संजीवनी निर्माण करणारी ही योजना असून पात्र शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. आपल्या शेतात विहीर मिळेल या आशेने शेतकरी सुखवला होता, मात्र हा आनंद औटघटकेचा ठरला आहे. अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट आहे. हाताशी आलेले पीक निसर्गाने हिरावून घेतले आहे. शेतकरी परिस्थिती सोबत संघर्ष करीत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित योजनेला ब्रेक न लावता ती राबविण्यात यावी, अशी एकमुखी मागणी पात्र लाभार्थ्यांकडून होत आहे. यासंदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी गोंदिया जिल्हा परिषदेचे जिल्हा कृषी अधिकारी मुंडे यांच्याशी त्यांच्या भ्रमणध्वनीवर वारंवार फोन केला. मात्र तो बंद येत असल्याने माहिती कळू शकली नाही.

# गावे हागणदारीमुक्त तरीही वेशीवर हागणदारीचे प्रदर्शन

**गोंदिया:** स्वच्छ भारत अभियानातून घर तेथे शौचालय योजना राबविण्यात आली. कुणीही उघड्यावर शौचास जाणार नाही असे ठरविण्यात आले. शौचालय बांधकामासाठी १२ हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले. त्यानुसार गोंदिया जिलह्यातील १ लाख १४ हजार ६४६ कुटुंबांना शौचालयाचा लाभ शासनाकडून देण्यात आल. त्यात आमगाव तालुक्यात १३ हजार २०७, अर्जुनी–मोरगाव तालुक्यात १५ हजार ८०५, देवरी १० हजार ६८४, गोंदिया तालुक्यात २८ हजार ६०, गोरेगाव १० हजार ९९९, सडक–अर्जुनी १० हजार ५६, सालेकसा ९ हजार ६७२, तिरोडा तालुक्यात १६ हजार १६३ शौचालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. ४ हजार ३२५ शौचालयांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

अनेकांनी शौचालय योजनेचा लाभ घेतला परंतु शौचालय असूनही लोक सकाळी उघड्यावर शौचाला जातात. ओडीएफ झालेला गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते आजही घाणीने माखलेले असतात. सकाळ, संध्याकाळ रस्त्याच्या दोन्ही बाजूला घाण पसरविण्याचे काम केले जाते. शौचालय घरात असूनही त्याचा वापर करताना लोक दिसत नाही. बाहेर गेल्याशिवाय संडास लागत नाही असे अनेक नागरिकांच म्हणने आहे.

**बांधण्यात आलेले शौचालय**

आमगाव १३२०७, अर्जुनी–मोरगाव १५८०५, देवरी १०६८४, गोंदिया २८०६०, गोरेगाव १०९९९, सडक–अर्जुनी १००५६, सालेकसा ९६७२, तिरोडा १६१६३

**शौचालयाचा वापर गोवऱ्या व सरपण साठविण्यासाठी**

शासनाने शौचालयाचा लाभ दिला. परंतु त्या शौचालयाचा वापर शौचासाठी नाही तर त्यात गोबऱ्या व सरपण साठवून ठेवण्यासाठी केला जातो. अनेक लोक टाकाऊ वस्तू किंवा शेती उपयोगी अवजारे, साहित्य साठवून ठेवण्यासाठी या शौचालयाचा वापर करीत असतात. घरात शौचालय असूनही महिला व पुरुष उघड्यावर जात असल्याचे चित्र आहे.

# चतुर्थ श्रेणीसाठी ४० वर्षांचा लढा

**गोंदिया:** पुर्वीच्या काळात राज्यात गावागावात मोठ्या संख्येने कोतवाल कार्यरत होते. मात्र आता त्यांच्या संख्येत घट झाली आहे. तरी सध्या राज्यात १२ हजार ५०० कोतवाल कार्यरत आहेत. मात्र या कोतवालांची चतुर्थ श्रेणीची मागणी मागील ४० वर्षापासून प्रलंबित आहे. मागील ४० वर्षापासून कोतवालांना चतुर्थ श्रेणी देण्यात यावी हीच त्यांची एकमेव मागणी आहे.



कोतवालांचे मुख्य काम शासकीय असते. आतासुद्धा तहसील कार्यालयात किंवा तलाठी साझ्यामध्ये ते काम करतान दिसतात. परंतु त्यांना राज्य शासनाने आतापर्यंत आपले कर्मचारी म्हणून मान्यता दिली नाही. त्यामुळे त्यांना आतासुद्धा मानधन दिले जात आहे. अत्यल्प मानधनात त्यांना आपले संपूर्ण जीवन काम करण्यात घालवावे लागत आहे. संपूर्ण जीवनभर शासकीय सेवा दिल्यानंतर म्हातारपणात त्यांना कसलेही आश्रय मिळत नाही.

अत्यल्प मानधनाम काम करणाऱ्या कोतवालांना म्हातारपणात सम्मानसुद्धा मिळत नाही. अशा स्थितीत त्यांना मृत्यूपर्यंत जीवन जगावे लागते. या कोतवालांना आतासुद्धा शासनाकडून केवळ ७ हजार ५०० रुपये मानधन मिळते. आजच्या महागाईच्या काळात जीवन जगण्यासाठी व कुटुंबाचे उदरनिर्वाह करण्यासाठी हे मानधन अत्यल्प ठरत आहे. फेब्रुवारी २०१९ पासून हे मानधन मिळत आहे. यापुर्वी २०१२ ते २०१९ पर्यंत त्यांना केवळ ५ हजार रुपये मानधन मिळत होते. २००१ ते २०१२ पर्यंत त्यांना केवळ २ हजार रुपये मानधन मिळत होते. एवढे अत्यल्प मानधनातही त्यांची केवळ एकच मागणी होती ती म्हणजे त्यांना चतुर्थ श्रेणी प्रदान करण्यात यावी, परंतु मागील ४० वर्षापासून त्यांची ही मागणी पूर्ण झाली नाही. जिल्ह्यात १५० कोतवाल आतासुद्धा शासकीय सेवा देत आहेत. तर संपूर्ण राज्यात त्यांची संख्या १२ हजार ५०० आहे.

**कामातही झाला फरक**

पुर्वीच्या काळी शासनाच्या योजनांची माहिती देण्याकरिता कोतवाल गावात फिरुन दवंडी देत होते. एकप्रकारे प्रचार आणि प्रसिद्धीची जवाबदारी कोतवालांवर होती. मात्र आता प्रसारमाध्यमे प्रभावी झाल्यामुळे कोतवालांच्या कामात फरक पडले. आता कोतवालांनी तलाठी कार्यालय, तहसील कार्यालयात बसून दस्तऐवजांची कामे करावी लागत आहेत.

**केवळ आश्वासनांचीच खैरात**

राज्यात आतापर्यंत अनेक सरकार बदलले. परंतु कोतवालांची चतुर्थ श्रेणीची एकमेव मागणी आतापर्यंत पूर्ण झाली नाही. दरवर्षी मोर्चा काढला जातो. मुख्यमंत्री किंवा इतर मंत्र्यांची भेट घेतली जाते व त्यांना निवेदनही दिले जाते. परंतु नेत्यांकडून मिळालेले आश्वासने हवेतच विरुन जातात. मागील ४० वर्षापासून कोतवालांच्या या मागणीकडे दुर्लक्षच केले जात आहे.

# घाटकुरोडा घाटावरून रेतीची तस्करी

**तिरोडा ::** तालुक्यातील घाटकुरोडा घाटावरुन रेतीची तस्करी होत आहे. सर्व रेती अवैधपणे भंडारा जिल्ह्यातील देव्हाडा येथे डंपिंग सेंटरमध्ये गोळा केली जाते. तिथून नागपूर तसेच सालईटोला, गोंडमोहाडी मार्गे गोंदिया व लागेल त्या ठिकाणी अवैध वाहतूक केली जात आहे. याची सर्व माहिती तहसीलदार प्रशांत बोरूडे यांना असूनही रेती तस्करीकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येत आहे. यात काय गौडबंगाल आहे, हे त्यांनाच ठाऊक.

रेती तस्करी मोठ्या प्रमाणात होत आहे. तलाठ्याने कारवाई केल्यास काही रेती तस्करांची गाडी सोडण्यास मज्जावही केले जाते. यात भंडारा, तुमसर तालुक्यातील ट्रक्टर्सना मुभा दिली जात आहे, तर तिरोडा तालुक्यातील ट्रक्टर्सवर कारवाई केली जात आहे. असा प्रकार तिरोडा तालुक्यात मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

काही नागरिकांनी १५ डिसेंबर २०२० रोजी रेतीची चोरी सुरू असल्याबाबत तहसीलदारांना फोन केले, पण त्यांनी उत्तर न देता फोन कापले व ते आले सुद्धा नाही. त्यामुळे रेतीची चोरी सुरूच राहिली. भंडारा जिल्ह्यातून रेती तस्कर येवून रेतीची चोरटी वाहतूक करतात. त्यांच्यावर कसलीही कारवाई केली जात नाही. मात्र, तिरोडा तालुक्यातील घरगुती कामाकरिता शेतातील माती नेत असलेल्या शेतक?यावर, ट्रॅक्टर मालकांवर कारवाई करून मोठ्या रकमेचा दंड वसूल केला जात आहे.

सालईटोला घाटावरुन दररोज रात्रीला गोंडमोहाडी मार्गे रेतीची चोरटी वाहतूक होते. याकडेही तहसीलदार व तलाठ्याचे दुर्लक्ष आहे. यात तहसीलदारांच्या खासगी चालकाचे ट्रक–ट्रक्टर्स चालकांशी काही धागेदोरे असल्याची चर्चा आहे. यापूर्वीचे तहसीलदार खासगी इसमाकडून रक्कम घेताना पकडण्यात आले होते, हे सर्वविदित आहे. मात्र, महसूल विभागातील असा प्रकार थांबणार तरी कधी? असा सवाल नागरिक विचारत आहेत.

या सर्व प्रकारामुळे जिल्हाधिका?यांनी या प्रकरणात लक्ष घालून तहसीलदारांवर कारवाई करावी, त्यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी तालुक्यातील नागरिकांची आहे.

# राजीव गांधी अपघात योजना, तीन वर्षात २५ विद्यार्थ्यांचा मृत्यू

## जिल्ह्यात अवघ्या ९ विद्यार्थ्यांच्या कुटुबियांना अनुदान, १६ प्रकरणे प्रलंबित

**गोंदिया:** राजीव गांधी अपघात योजनेतून अवघ्या १३ जणांनाच अनुदान मिळाले. तर १६ जणांचे अनुदान मागील दोन वर्षापासून मिळू शकले नाही. निधीचा अभाव असल्यामुळे त्या लाभार्थ्यांना अनुदानाची राशी देता येऊ शकली नाही. सन २०१८–१९ या वर्षात १३ मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना ९ लाख ४० हजार रुपयाचे अनुदान देण्यात आले. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अपघात वमि संरक्षण देण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने राजीव गांधी अपघात सानुग्रह योजनेचा लाभ देण्यात येतो.



मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना ७५ हजार रुपये सानुग्रह अनुदान दिले जाते. सन २०१९–२० या वर्षातील ११ प्रकरणे असे १६ प्रकरणे प्रलंबित आहेत.

या मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह मदत म्हणून देण्यासाठी १२ लाख रुपयाची गरज आहे. परंतु शासनाने मागील दोन वर्षापासून ही मदत न दिल्यामुळे १६ मृत विद्यार्थ्यांच्या एकाही कुटुंबियांना कवडीची मदत मिळाली नाही. अनुदान शासनाने पाठविल्यास त्यांच्या कुटुंबियांना मदत देण्यात येईल. ११ प्रकरणे मंजूर असून यंदाचे ५ प्रकरणे प्रलंबित आहेत.

**खबरी अहवाल पंचनामा..अनेक प्रकरणे प्रलंबित**

अपघाती मृत्यू झाला हे दर्शविणारा खबरी अहवाल, इंन्कवेस्ट पंचनामा पोलिसांकडून मिळाला नसल्याने काही प्रकरणे प्रलंबित आहेत. कागदपत्राच्या तुट्या आल्या तर शिक्षण विभाग त्या तृट्यांची पूर्तता करुन अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न करते. परंतु अनुदानच न आल्याने राजीव गांधी अपघात विमा योजनेचा लाभ विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना मिळू शकला नाही.

# अखेर शौचालय लाभार्थ्यांना निधी वाटप


**गोरेगाव:** तालुक्यातील झांजीया येथील शौचालय लाभार्थ्यांना मागील तीन वर्षापासून शौचालयाचा निधी प्राप्त झाला नव्हता. लाभार्थ्यांनी रविकांत बोपचे यांना निधी मिळवून देण्याची मागणी केली. रविकांत बोपचे यांच्या पाठपुराव्याने अखेर शौचालय लाभार्थ्यांना निधी प्राप्त झाला आहे.



तालुक्यातील झांजीया येथील २०१७–१८ मध्ये एमआरईजीएस अंतर्गत शौचालयाचे बांधकाम करण्यात आले होते. परंतु मागील तीन वर्षापासून लाभार्थ्यांना शौचालयाचे पैसे मिळाले नव्हते. याबाबत लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत सचिव व संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना अर्ज दिले. परंतु त्या अर्जावर कोणत्याही प्रकारचा निकाल लागला नाही. अखेर लाभार्थ्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवा नेते रविकांत बोपचे यांना शौचालयाचे पैसे मिळण्याबाबत विनंती केली. बोपचे यांनी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना रितसर झांजीया येथील एमआरईजीएस अंतर्गत शौचालयाचे पैसे मिळाले नाही. अशा सर्व लाभार्थ्यांचे नावानीशी पत्रव्यवहार करुन पैसे देण्याची मागणी केली. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून लाभार्थ्यांना धनादेश प्राप्त झाला आहे. निधी मिळवून दिल्याबद्दल लाभार्थ्यांनी रविकांत बोपचे यांचे आभार मानले.

# सिमेंट रस्ता बांधकामामुळे रस्त्यावर धुळीचे साम्राज्य

**चिचगड:**–देवरी ते आमगांव सिमेंट रस्त्याच्या चौपदरीकरणाचे बांधकाम सध्या स्थितीत सुरू आहे. वडेगांव गावाजवळ जुना रस्ता पूर्णता उकडून गेल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धुळीचे प्रमाण वाढले आहे. मात्र या रस्त्यावर पाण्याची फवारणी केली जात नाही?. यामुळे येणाऱ्या–जाणाऱ्या च्या नाकातोंडात दूर जात आहे. रोडालगतच्या घरातील लोकांना धुळीच्या सामना करावा लागत आहे. मात्र याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष झालेले आहे.



या रस्त्यावर मोठ्या वाहनांची रहदारी अधिक प्रमाणात आहे. यामुळे रस्त्यावर धुळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. दुचाकी तसेच चारचाकी वाहनांना समोरून मागून येणारे वाहन दिसत नाही. त्यामुळे एखादे मोठे अपघात घडू शकते या अपघाताला जबाबदार कोण ? असा प्रश्न नागरिकांसमोर उपस्थित होत आहे. या रस्त्यावर पाण्याची फवारणी केली जात नाही. या कारणाने रस्त्यावर धुळीचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात पसरले आहे. या रस्त्यावर दिवस रात्र प्रचंड वाहतूक असते. या उखडलेल्या रस्त्यांची काळजी घेणे संबंधित विभागाचे कर्तव्य आहे. मात्र तसे दिसत नाही. याकडे लक्ष देण्याची गरज आहे ?. रोडा लगतच्या घरातील लोकांना या समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यांच्या श्वसनाच्या आजारात वाढ होत आहे.

वडेगांव येथे असे धुळीचे चित्र पाहायला मिळत आहे. या रस्त्याचे बांधकाम मंदगतीने सुरू असून याकडे संबंधित विभागाने जातीने लक्ष घालून मोठ्या प्रमाणात धुळी मुळे निर्माण झालेल्या समस्यांचे निराकरण होणार की नाही याकडे सर्व वडेगांव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.